cmyk

## संपादकीय

### सरसकट साफसफाईची मोहीम हाती घ्यावी

पुण्यातील अमली पदार्थांचे सेवन करण्यात येत असल्याच्या चित्रफीत समोर आल्याने ड्रग्जचा प्रश्न चांगलाच ऐरणीवर आल्याचे दिसून येत आहे. मागच्या ऑक्टोबर २०२३ मध्ये ड्रग्ज तस्कर ललित पाटीलच्या अटकेतून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या होत्या. ड्रग्ज तस्करीच्या या प्रकरणात पाटीलला पोलिसांपासून ते वैद्यकीय अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांची मदत झाल्याची माहिती पुढे आली होती.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या ठरावावर काँग्रेसकडून नाराजी

नवी दिल्लीः लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आणीबाणीच्या विरोधात ठराव आणल्याबद्दल नाराजी व्यक्त करताना काँग्रेसने म्हटले आहे की, राजकीय संदर्भ देणे, तेही पदभार स्वीकारण्याच्या दिवशी, खूप धक्कादायक आणि संसदेच्या इतिहासातील आश्चर्यकारक होता. अध्यक्षांकडून असा राजकीय संदर्भ घेणे संसदेच्या इतिहासात आश्चर्यकारक आहे. नवनिर्वाचित सभापतींच्या पहिल्या कर्तव्या पैकी एक म्हणून अध्यक्षपदावरून येणारे हे आणखी गंभीर प्रमाण गृहीत धरते, असे काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांनी बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–७८ | शुक्रवार दि.२८ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# दूध दरासाठी शेतकरी आक्रमक; आजपासून राज्यभर आंदोलन



मुंबई । प्रतिनिधी

दूध उत्पादकांच्या विविध मागण्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार (दि. २८) पासून राज्यात अधिक संघटितपणे आंदोलन सुरु होत आहे. किसान सभा आणि समविचारी विविध शेतकरी संघटना, कार्यकर्ते व आंदोलकांमध्ये समन्वय स्थापित करून हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे, अशी माहिती दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे डॉ. अशोक ढवळे, डॉ. अजित नवले, उमेश देशमुख आदींनी पत्रकाद्वारे दिली.

दुधाला किमान ४० रुपये भाव मिळावा, या मागणीसाठी राज्यभर दूध उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरत आहेत. वर्षभर सातत्याने तोटा सहन करावा लागल्याने दूध उत्पादकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या नाराजीचा उद्रेक आंदोलनांच्या निमित्ताने पुढे येत आहे. उत्स्फूर्तपणे दूध उत्पादकांनी ठिकठिकाणी रास्ता रोको, उपोषणे, निदर्शने सुरु केली आहेत. सरकारने या आंदोलनाची दखल घ्यावी व दूध उत्पादकांच्या मागण्या मान्य कराव्यात, असे आवाहन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती सरकारला करत आहे. वर्षभर दूध दराबाबत शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीची भावना आहे. प्रति लिटर १० ते १५ रुपयांचा तोटा सहन करून दूध उत्पादक शेतकरी दूध घालत आहेत. दूध उत्पादनातील वाढता तोटा सहनशक्तीच्या पलीकडे गेला आहे. पान २ वर

### शेतकरी संघटना सहभागी होणार

#### दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या मागण्या

*दुधाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी तत्कालीन उपाययोजनांच्या बरोबरच दिर्घकालीन दूध धोरण तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. दुधाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळावा, यासाठी उसाप्रमाणे दुधालाही एफआरपी, रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करावे, दुग्ध मूल्य आयोगाची स्थापना करावी, पशुखाद्य व पशु औषधांचे दर नियंत्रित करावेत, खासगी व सहकारी दूध संघाना लागू होईल, असा लुटमार विरोधी कायदा करावा, दूध भेसळ रोखावी, अनिष्ट ब्रँड वॉर रोखण्यासाठी एक राज्य एक ब्रँड धोरणाचा स्वीकार करावा, मिल्को मीटर व वजन काट्यात होणारी दूध उत्पादकांची लुटमार थांबविण्यासाठी तालुका निहाय स्वतंत्र तपासणी निरीक्षकांची नियुक्ती करावी, शासकीय अनुदानातून पशु आरोग्य विमा योजना सुरु करावी, या मागण्या संघर्ष समिती करीत आहे.*


### तोडगा काढण्यासाठी सरकारची उद्या बैठक

*मुंबई : दूध दरवाढी संदर्भात सरकारकडून दूध प्रकल्प प्रतिनिधी आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांची महत्वाची बैठक शनिवार (दि.२९) विधानभवनात बोलावण्यात आली आहे. राज्याचे महसूल तथा पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. या बैठकीत दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून त्यावर तोडगा काढला जाणार आहे. या बैठकीला राज्यातील खासगी तथा सहकारी दूध महासंघाचे प्रतिनिधी, दूध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याचे दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे आयुक्त प्रशांत मोहोड यांनी सांगितले. बैठकीत शेतकऱ्यांचे प्रश्न जाणून घेत त्यावर सविस्तर चर्चा करण्यात येईल व या बैठकीचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येईल. तसेच लवकरच दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला जाईल असे आयुक्त मोहोड यांनी सांगितले.*

# राजकीय वातावरण तापले; कुंडलिक खांडेंचे कार्यालय फोडले

## पंकजांना धोका दिल्याने मुंडे समर्थक आक्रमक, पदही येणार धोक्यात





बीड । प्रतिनिधी

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर बीडमधील मुंडे समर्थक चांगलेच आक्रमक झाले आहे. बीड शहरातील जालना रोडवर असलेल्या खांडे यांच्या कार्यालयावर दगडफेक करण्यात आली असून ऑफिसची तोडफोड करण्यात आली आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणेंना कुंडलिक खांडेंची कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. त्यामुळे खांडे यांचे जिल्हाप्रमुख पदही आता धोक्यात येण्याची शक्यता आहे.

कथित व्हायरल क्लिपनंतर आज मुंडे समर्थकांनी सोशल मिडीयावर संताप व्यक्त केला. तसेच ही क्लिप काही क्षणातच सर्वत्र व्हायरल झाली. त्यानंतर संतापलेल्या मुंडे समर्थकांनी कुंडलिक खांडे यांचे कार्यालयाची तोडफोड केली आहे. जालना रोड परिसरात कुंडलिक खांडे यांचे कार्यालय आहे. आणि याच कार्यालयाची तोडफोड मुंडे समर्थकांनी केली. कथित ऑडिओ क्लिपमध्ये कुंडलिक खांडे हे पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या बाबत बोलले. यानंतर मुंडे समर्थकांकडून जिल्ह्यात संताप व्यक्त केला जात आहे. कुंडलिक पान २ वर

### वरिष्ठ कारवाई करतील–राजेंद्र मस्के

*महायुतीचा धर्म सर्वांनी पाळायला हवा होता. मात्र, अनेकांकडून तो पाळला गेला नाही असे जर काही चुकीचे झालेला असेल तर जी ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे ती धक्कादायक आहे. युती धर्म सगळ्यांनी पाळायला हवा होता ऑडिओ क्लिप वायरल होत आहे, याची सत्यता तपासून आम्ही ती वरिष्ठांना कळवू, वरिष्ठ याच्यावर कारवाई करतील, अशी प्रतिक्रिया भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.*

### मुख्यमंत्र्यांशी याबाबत बोलणार–अनिल जगताप



*अशी भूमिका घेणे चुकीचे असून कोणत्याही नेत्यांविषयी असे बोलणे बरोबर नाही, असे सांगून कुंडलिक खांडे यांचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी समर्थन केले नाही. त्यांचीही कॉल रेकॉर्डिंग खांडे यांच्यानंतर व्हायरल झाली आहे. त्यात त्यांनी हा सर्व प्रकार चुकीचा असल्याचे म्हटले आहे. याबाबत आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी पक्षाची बैठक असून त्यावेळी बोलणार असल्याचे सांगितले असून आपणही मुंबईत असल्याचे म्हटले आहे.*

### “ धनंजय मुंडे यांच्यावर हल्ला करण्याची भाषा

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना निवडणुकीत मतांसह पैश्याची मदत केल्याची कबुली, देखील या ऑडिओ क्लिप मध्ये आहे. ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे, मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर हल्ला करण्याची देखील खांडेची भाषा, ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर जिल्हाभरात खळबळ उडाली आहे.

### काय आहे व्हायरल ऑडिओ क्लिपमध्ये?

*कुंडलिक खांडे यांच्यासोबत एका राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्याची चर्चा चालू असताना निवडणुकीपूर्वीच बजरंग सोनवणे यांना त्यांनी कशी मदत करायची हे सांगतानाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या ऑडिओतून दोघांमधील संवाद ऐकायला मिळत आहे. तर, दुसरी ऑडिओ क्लिप ही मतमोजणीनंतरची आहे, ज्यामध्ये म्हाळस जवळा या कुंडलिक खांडेंच्या मूळ गावातून पंकजा मुंडेंना मुद्दामून लीड दिली. कारण, ओबीसी मताचा आपल्याला फायदा होऊ शकतो हे सांगत असताना बीड विधानसभा मतदारसंघातील सगळ्या बुथवर कशाप्रकारे बजरंग सोनवणे यांच्यासाठी त्यांनी फिल्डिंग लावल्याचे ते सांगत आहेत. त्यामध्ये, धनंजय मुंडे आणि त्यांचे सहकारी वाल्मिक कराड त्यांच्याबाबतीत बोलत त्यांच्या गाडीवर दगडफेक करण्याबाबत बोलत आहेत.*

### नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयची मोठी कारवाई

नवी दिल्लीः नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने गुरूवारी (दि.२७ जून) मोठी कारवाई केली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने बिहारमधील पाटणा येथून दोन संशयित आरोपींना अटक केली आहे. अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे मनीष प्रकाश आणि आशुतोष अशी असल्याची माहिती देखील केंद्रीय अन्वेषण विभागाने दिली आहे.

बिहार सरकारने सोमवारी नीट पेपर लीक प्रकरण केंद्रीय अन्वेषण ब्युरोकडे सोपविण्याबाबत अधिसूचना जारी केली. त्यानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाने नॅशनल एलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट (नीट) पेपरफुटी प्रकरणी पहिल्यांदाच मोठी कारवाई केली आहे. वैद्यकीय प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षा पेपरफुटीचा प्रकार समोर आल्याने देशभरात खळबळ माजली आहे. तब्बल २५ लाखांपेक्षा पान २ वर

# पश्चिम महाराष्ट्रातल्या सहा आमदारांनी घेतली जयंत पाटलांची भेट

मुंबई । प्रतिनिधी

अजित पवार गटाचे काही आमदार शरद पवार गटात परत जाणार असल्याची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. त्या चर्चांना आता बळ मिळणारी घटना घडली आहे. अजित पवार गटाच्या सहा आमदारांनी जयंत पाटलांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातल्या आमदारांचा समावेश असल्याने अजित पवार गटामध्ये चिंतेचं वातावरण आहे.

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर शरद पवार गटाच्या संपर्कात अजित पवारांचे आमदार असल्याची चर्चा होती. तशा प्रकारचा दावा जयंत पाटील आणि आमदार रोहित पवारांकडून करण्यात येत होता. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे विधीमंडळाच्या कामकाजासाठी आले होते. त्याचवेळी एका कार्यालयात अजित पवार गटाच्या सहा आमदारांनी त्यांची भेट घेतल्याची माहिती समोर येत आहे. या बैठकीवेळी जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे आणि अनिल पान २ वर

### जयंत पाटील अनुभवी नेते–आ.रोहित पवार

आमदार रोहित पवार हे यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले, जयंत पाटील हे अनुभवी नेते आहेत. कधी कुठले कार्ड काढायचे हे त्यांना माहिती आहे. ही तर फक्त सुरूवात आहे. शरद पवार हे महायुतीच्या नेत्यांपेक्षा कितीतरी पटीने पुढे आहेत हे लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने समोर आले आहे. जे कुणी चांगले असतील त्यांचे स्वागत आहे. पण ज्या आमदारांनी उन्माद केला, लोकभावनेच्या विरोधात भूमिका घेतली त्यांच्यावर शरद पवार, जयंत पाटील निर्णय घेतील.

# माजलगावचा भुमिपुत्र नगरमध्ये एसीबीच्या जाळ्यात!

बीड । प्रतिनिधी

**लाचखोरी बीड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभरात मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे. बांधकाम परवाना देण्यासाठी अहमदनगर येथील महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.पंकज जावळे यांनी आठ लाखाच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ.पंकज जावळे हे मूळचे माजलगाव तालुक्यातील असून या कारवाईने राज्यात खळबळ उडाली आहे.**

डॉ.पंकज जावळे (वय–४७, पद– आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका, अहमदनगर (वर्ग –१ ) मूळ रा.माजलगाव जि.बीड) व श्रीधर देशपांडे (वय ४८, पद– लिपिक टंकलेखक अतिरिक्त पदभार स्विय सहायक आयुक्त महानगरपालिका, अहमदनगर ( वर्ग ३ )रा.अहमदनगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या लाचखोरांची नावे आहेत. यातील तक्रारदार हे त्यांचे भागीदारांसह ४ के रियाल्टी या नावाने बांधकाम व्यवसाय करतात. त्यांनी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नालेगाव येथे २२६०.२२ चौरस मीटर प्लॉट खरेदी केलेला आहे. सदर प्लॉटवर तक्रारदार यांना त्यांचे भागीदारांसह बांधकाम करावयाचे असल्याने त्यांनी बांधकामासाठी लागणारी बांधकाम परवानगी मिळण्यासाठी महानगरपालिका कार्यालय पान २ वर


# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून विरोधक आक्रमक

मुंबई । प्रतिनिधी

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरूवारपासून सुरू झाले असून, १४ व्या विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून विरोधक आक्रमक झाले. शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे, यासाठी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवन पायऱ्यांवर आंदोलन केले.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला बुधवारी सरकारने दिलेले चहापानाचे निमंत्रण विरोधकांनी नाकारून सरकारविरोधात अधिवेशन सुरू होण्याआधीच शड्डू ठोकला पान २ वर

### पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधान भवन पायऱ्यांवर विरोधकांचे आंदोलन



### १४ व्या विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन

या अधिवेशनाचा समारोप १२ जुलैला होणार आहे. तीन आठवडे चालणारे हे अधिवेशन वादळी ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. १४ व्या विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन आहे. सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्याचे सर्वतोपरी प्रयत्न विरोधकांतर्फे केले जाणार असून, शेवटच्या अधिवेशनात विविध घोषणा, अर्थसंकल्प यांच्या माध्यमातून मतदारांना पुन्हा एकदा संधी देण्याची साद महायुती सरकार घालणार आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १२.०० क्विंटल | २,२०१ | ३,००० | २,६५८ |
| ज्वारी/हायब्रिड :११२.०० क्विंटल | २,१०० | ३,२०० | २,३८८ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ५.५० क्विंटल | ६,००० | ११,११० | ८,८५३ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,१९० | २,६९१ | २,४७७ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ९६.०० क्विंटल | ४,५११ | ४,५३१ | ४,५२४ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,४९१ | ६,४९१ | ६,४९१ |

# महाराष्ट्र गुजरातपेक्षा खाली सरकला

## दरडोई उत्पन्न महाराष्ट्रापेक्षा गुजरातचे जास्त, आर्थिक सर्व्हेक्षण अहवालात माहिती

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील उद्योग गुजरातला पळवून नेण्यावरून मध्यंतरीच्या काळात अनेक आरोप–प्रत्यारोप झाल्यानंतर भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला गेल्याने महाराष्ट्रातली उत्पन्न कमी होत नाही, असे राजकिय विधान करत उद्योगाबाबत आजही महाराष्ट्र एक नंबरवर असल्याचा दावाही केला होता. मात्र राज्याच्या आर्थिक सर्व्हेक्षण अहवालात महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्नात घट झाली असल्याची माहिती पुढे आली असून, देशभरात पाचव्या स्थानावर असलेल्या महाराष्ट्राचे स्थानही गुजरातने घेत महाराष्ट्राला सहाव्या स्थानावर ढकलल्याची माहितीही आर्थिक सर्व्हेक्षणात देण्यात आली आहे.**



राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार २०२२–२३ मध्ये महाराष्ट्र राज्य दरडोई उत्पन्नात पाचव्या स्थानी होते. मात्र, वर्षभरात या स्थानावरून घसरण होत महाराष्ट्र सहाव्या स्थानावर फेकला गेला असून गुजरातने दरडोई उत्पन्नात पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवले आहे. राज्याच्या कृषी आणि संलग्न कार्य क्षेत्रात १.९ टक्के वाढ अपेक्षित असताना गेल्या वर्षीच्या तुलनेत तृणधान्य, कडधान्ये, तेलबिया, ऊस यांच्या उत्पादनात अनुक्रमे २३ टक्के, १० टक्के, २ आणि १७ टक्के इतकी घट अपेक्षित असल्याने राज्याची चिंता वाढली आहे. सन २०२३–२४ मध्ये देशाच्या आणि राज्याच्या अर्थसव्यस्थेतील वाढ प्रत्येकी ७.६ टक्के वाढ असेल, असा अंदाज पाहणीत व्यक्त करण्यात आला आहे. सुधारित अंदाजानुसार २०२३–२४ साठी राज्याची महसुली जमा ४ लाख ८६ हजार १६ कोटी असून महसुली खर्च ५ लाख ५ हजार ६४७ कोटी आहे. गेल्या आर्थिक वर्षात फेब्रुवारीपर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्च ३ लाख पान २ वर

### देशात तेलंगणा अव्वल...

राज्याची आर्थिक सुस्थिती स्पष्ट करणाऱ्या घटकांपैकी एक असलेल्या दरडोई उत्पन्न या निकषात तेलंगणा हे राज्य देशात अव्वल ठरले आहे . कर्नाटकला मागे टाकत तेलंगणाने दरडोई उत्पन्न वाढीत बाजी मारली आहे. दरडोई उत्पन्नात तेलंगणा पाठोपाठ कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू आणि गुजरात असा क्रमांक लागतो. महाराष्ट्र सहाव्या स्थानी असले तरी २०२२–२३ च्या तुलनेत राज्याच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे. २०२१–२२ मध्ये दरडोई उत्पन्न २ लाख १९ हजार ५७३ रुपये होते ते वाढून २०२२–२३ मध्ये २ लाख ५२ हजार ३८९ रुपये झाले आहे . २०२३–२४ मध्ये दरडोई उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल, असा अंदाज अहवाला व्यक्त करण्यात आला आहे.

cmyk

## अग्रलेख

# सरसकट साफसफाईची मोहीम हाती घ्यावी

पुण्यातील अमली पदार्थांचे सेवन करण्यात येत असल्याच्या चित्रफीत समोर आल्याने ड्रग्जचा प्रश्न चांगलाच ऐरणीवर आल्याचे दिसून येत आहे. मागच्या ऑक्टोबर २०२३ मध्ये ड्रग्ज तस्कर ललित पाटीलच्या अटकेतून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या होत्या. ड्रग्ज तस्करीच्या या प्रकरणात पाटीलला पोलिसांपासून ते वैद्यकीय अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांची मदत झाल्याची माहिती पुढे आली होती. त्यामुळे ससून रूग्णालयात पोलिसांचा २४ तास खडा पहारा असतानाही तिथे मेफेड्रॉन आरामात कसे पोहोचायचे आणि तो तेथून लाखो रूपयांचा व्यवहार कसा करायचा, याच्या सुरस कथा बाहेर आल्या होत्या. त्यानंतर नाशिक, सोलापुरातील कारखान्यांवर छापे घातले गेले. तेथून करोडो रूपयांचे मेफेड्रॉनही जप्त करण्यात आले. परंतु, त्यानंतरही ड्रग्ज तस्करीला आळा बसण्याऐवजी त्याचा बाजार जोमात असल्याचे पहायला मिळत आहे. हे अतिशय गंभीर म्हणावे लागेल.

सध्या अल्पवयीन मुलांमधील गुन्हेगारीचे प्रकार वाढले आहेत. दोन जणांचा बळी घेणाऱ्या पोर्शे कार अपघातातील बिल्डरपुत्रानेही मद्यपान केल्याचे निष्पन्न झाले होते. मात्र, यातून मुले किंवा त्यांचे पालक धडा घेताना दिसत नाहीत. आपला मुलगा कुठे जातो, कुणासोबत जातो, त्याला काही चुकीच्या सवयी तर लागल्या नाहीत ना, याकडे बहुतांश बड्या घरचे पालक फारसे लक्ष देताना दिसत नाहीत. उलट लाडोबांना हवे ते पुरवण्याकडे त्यांचा कल असतो. त्यातूनच आजची तरूणाई बेधुंद व बेछूट होत असल्याचे दिसते. पबमधील पार्टीत मोठ्या संख्येने अल्पवयीन मुले येत असतील, तर त्याचे उत्तरदायित्व त्यांच्या पालकांकडेही जाते. दुसरीकडे याप्रकरणी हलगर्जीपणा केल्याबद्दल आयुक्तांनी अधिकाऱ्यांसह पोलिसांवर निलंबनाचीही कारवाई केली आहे. ललित पाटील प्रकरणातही पोलिसांवर कारवाईचा बडगा उगारला होता. मात्र, त्यानंतरही अशा प्रकरणांमध्ये पोलीस यंत्रणेतील काही घटकांचा सहभाग आढळून येणे, हा कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार म्हटला पाहिजे. हे पाहता भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी गृह विभागाला मोठ्या प्रमाणात साफसफाई मोहीम हाती घेणे क्रमप्राप्त ठरेल.

दुसऱ्या बाजूला पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाचे नियम धुडकावून संबंधित पब पहाटे पाचपर्यंत सुरू असल्याचेही अधिक तपासास समोर आले आहे. एखादी घटना घडल्यानंतर तेवढ्यापुरत्या कारवाया होतात. मात्र, काही काळ लोटल्यानंतर या सगळ्या गोष्टी यथास्थित सुरू राहतात, हा आजवरचा अनुभव आहे. म्हणूनच याबाबत गृह व उत्पादन शुल्क विभागाने काटेकोर धोरण अवलंबणे आवश्यक आहे.. राज्याचे गृहमंत्रिपद देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या कार्यक्षम नेत्याकडे आहे. मात्र, मागच्या काही महिन्यांतील घटना बघता गृह विभागापुढील आव्हाने दिवसेंदिवस वाढताना दिसतात. त्यामुळे फडणवीस यांना अधिकचे लक्ष द्यावे लागेल. उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांचे खातेही अलीकडे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात सापडताना दिसत आहे. आगामी काळात देसाई यांनाही आपला खात्यावरील वचक दाखवावा लागेल. तरूण पिढीला अमलीपदार्थाच्या नादी लावायचे, त्याकरिता आपले नेटवर्क वेगवेगळ्या शहरांमध्ये वाढवायचे आणि त्यातून लाखो ऊपये कमवायचे, हा एक पद्धतशीर कट आहे. तरूणाईच्या भवितव्यासाठी तो उधळून लावावाच लागेल.

# महाराष्ट्र कर्जात डूबवला, २.५ लाख कोटींचे कर्ज लादले

## नाना पटोले यांची टीका, मुख्यमंत्र्यांकडील एमएमआरडीए तोट्यात कसे?



मुंबई । प्रतिनिधी

**महाभ्रष्टयुती सरकारने राज्यावर कर्जाचा डोंगर वाढवून ठेवला असून विकासाच्या नावाखाली कर्ज काढून भ्रष्ट मार्गाने मलिदा खाल्ला जात आहे. जागतिक बँकेसह इतर बँकांकडूनही कर्ज काढले आहे, महायुती सरकारने राज्यावर २.५ लाख कोटी रुपयांचे कर्ज करुन ठेवले आहे. एमएमआरडीए सारखा विभाग नफ्यात होता तोही आता तोट्यात आहे. हा विभाग मुख्यमंत्र्यांकडे असतानाही घाट्यात कसा? असा सवाल उपस्थित करत राज्यच लिलावात काढतात की काय? अशी परिस्थिती करून ठेवली आहे, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.**

### तेलंगणाप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांनाही कर्जमाफी द्या

नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, तेलंगणाप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांनाही कर्जमाफी जाहीर झाली पाहिजे तसेच जुनी पेन्शन योजना लागू करावी अशी मागणी करत हे अधिवेशन महायुती सरकारचे निरोपाचे अधिवेशन असून जनतेला हिशोब देण्याची वेळ आहे, तो हिशोब द्यावा लागेल. जबाबदार विरोधी पक्ष म्हणून जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सभागृहात प्रश्न मांडू, सरकारमध्ये हिम्मत असेल तर प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करावी, बहुमताच्या बळावर पळ काढू नये, असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारवर तोफ डागत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महाराष्ट्र व उत्तर प्रदेशची तुलना केली तर उत्तर प्रदेश सरकारही असेच कर्ज काढून रस्ते बांधणीचे प्रकल्प करत आहे. उत्तर प्रदेश व महाराष्ट्राच्या रस्ते प्रकल्पाचे अंदाजपत्रक पाहिले तर महाराष्ट्रातील अंदाजपत्रक ४० टक्क्याने वाढीव आहे. या रस्त्यांच्या कामाचा दर्जाही निकृष्ट आहे. अटल सेतुलाही भेगा पडल्या आहेत हे सर्वांनी पाहिले आहे. १८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाला भेगा पडतात यावरून त्याच्या कामाचा दर्जा किती निकृष्ठ आहे हे दिसून येते. कर्नाटकातील पूर्वीचे भाजपा सरकार ४० टक्के कमिशनवाले होते तर महाराष्ट्रातील युती सरकार ६० टक्के कमिशनवाले आहे.

# लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त मोफत पिक विमा ऑनलाईन केंद्राची स्थापना

## डॉ.ज्योती मेटे यांच्या हस्ते आज उद्घाटन; शिवसंग्राम शेतकरी आघाडीचा अनोखा उपक्रम



बीड । प्रतिनिधी

**वेळोवेळी निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी शेतकऱ्यांना याचा फटका बसतो. यावर मात करण्यासाठी पिक विमा उतरवणे अत्यंत गरजेचे असते. विहित कालावधीमध्ये पिक विमा काढण्या करिता शेतकऱ्यांना सेंटरवर धाव घ्यावी लागते. याचा गैर फायदा अनेक केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची लूट केली जाते हे निदर्शनास आल्यावरून शेतकऱ्यांकरिता प्रक्रिया सुलभ व विनामूल्य करण्याच्या दृष्टिकोनातून लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त शिवसंग्राम किसान आघाडीच्या वतीने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.**

यातून स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी हायात भर शेतकऱ्यांप्रती जोपासलेली भावना त्याच निष्ठेने शिवसंग्राम पुढे नेत आहे हे बाब अधोरेखित होते. दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयतीनिमित्त कृतज्ञता सप्ताह अंतर्गत शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली गोर गरीब शेतकऱ्यांना पीक विमा ऑनलाईन करण्यासाठी अनेक केंद्रावर शंभर ते दीडशे रुपये देऊन पीक विमा ऑनलाईन करावा



लागत आहे. हा पीक विमा अर्ज ऑनलाईन करणे हे कोणताही मोबदला न घेता मोफत करून देणे या मागचा प्रमुख उद्देश आहे. शेतकऱ्यांना मोफत ऑनलाईन पीक विमा भरून देण्याची सुरुवात दि. २८ जून शुक्रवार रोजी डॉ. ज्योती मेटे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन शिवसंग्राम कार्यालय नगर नाका, नगर रोड, बीड येथे करण्यात येणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा . मोफत पीक विमा भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत अशी माहिती शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी दिली आहे.

# संपूर्ण क्रांती आणण्यासाठीच आझाद क्रांती सेनेचा जन्म–सेना प्रमुख राजेश घोडे

माजलगाव । प्रतिनिधी

**छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने दि २६ जुन बुधवार रोजी येथील हॉटेल व्यंकटेश येथे आझाद क्रांती सेना स्थापनेची घोषणा पत्रकार परिषद घेऊन सेना प्रमुख राजेश घोडे सेनेचे महासचिव कडुदास कांबळे तसेच आंबेडकरी चळवळीतील नेते ऑड अरुण जाधव,राजेश क्षीरसागर,रघुनाथ शिंदे,संदीप दात्रे यांनी केली स्थापना झाल्यानंतर पुढे गाव, तालुका, जिल्हा,व महाराष्ट्र, कार्यकारणी लवकरात लवकर घोषित करण्यात येईल असेही या पत्रकार परिषदेमध्ये राजेश घोडे यांनी सांगितले.**

या आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख म्हणून राजेश घोडे व तसेच विचार मंचावर सेनेचे महासचिव कडूदास कांबळे,अँड अरुण जाधव,राजेश क्षीरसागर,रघुनाथ शिंदे,संदीप दात्रे हे या पत्रकार परिषदेला उपस्थित होते पत्रकार परिषद संपन्न झाल्याच्या नंतर आलेल्या तरुण कार्यकर्त्यांना सेना प्रमुख राजेश घोडे यांनी संपूर्ण चळवळीतील नेत्यांनी मार्गदर्शन केले यावेळी बोलताना राजेश घोडे म्हणाले की मुझे संपूर्ण क्रांती चाहिये आणि या देशांमध्ये संपूर्ण क्रांती आणण्यासाठीच आझाद क्रांती सेनेचा जन्म झालेला आहे दि २६ जानेवारी १९४९ रोजी आम्हाला राजकीय लोकशाही




मिळाली परंतु अजून इथल्या उपेक्षित वंचित विस्थापित समूहाला सामाजिक आर्थिक लोकशाही मिळणं बाकी आहे म्हणून या देशांमध्ये आम्हाला सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक क्रांती आणि बदल घडवून आणण्यासाठी ही आझाद क्रांती सेना भविष्यात व्यापक स्वरूपाचा लढा गावापासून ते दिल्लीच्या तक्तापर्यंत उभा करणार आहे तेव्हा त्यासाठीच या आझाद क्रांती सेनेचा जन्म झाला आहे या स्थापना प्रसंगी आझाद क्रांती सेनेचे तरुण तडफदार सैनिक उपस्थित होते हॉलमध्ये आझाद क्रांती सेनेच्या जयघोषाने सभागृह दणाणून गेले याप्रसंगी आलेल्या तरुण सैनिकाला आझाद क्रांती सेना पुढे घेऊन जाण्यासाठी शुभेच्छा तुकाराम शिंदे यांनी देऊन आभार मानले.

# अखेर पंकजा मुंडेंना विधानपरिषद मिळणार

## ५ जागांसाठी भाजपकडून ३ पराभूत नेत्यांना संधी

मुंबई । प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत भाजप महायुतीला अपेक्षित यश मिळाले नसून आपल्या पराभवाची कारणमिमांसा करताना भाजपने मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्दयांवरही मंथन केले आहे. तसेच, मराठवाड्यात बसलेल्या राजकीय पराभवावर मार्ग काढण्याच्या हालचाली आता भाजपकडून सुरू झाल्याचे दिसून येत आहे. कारण, आगामी विधानपरिषद निवडणुकांसाठी भाजपकडून ११ नावांची चर्चा सुरू असून या विधानपरिषदेच्या जागेसाठी पंकजा मुंडेंनाही संधी मिळण्याची शक्यता आहे.**



लोकसभा निवडणूक निकालानंतर सर्वच राजकीय पक्ष ऑक्टोबर महिन्यात घोषित होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या तयारीला लागले आहेत. तत्पूर्वी विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी नुकतीच निवडणूक पार पडली असून पुढील महिन्यात विधानपरिषदेच्या ११ जागांसाठीही निवडणूक होत आहे. त्या पार्श्वभूमीवर आता भाजपकडून विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी ११ नावांची चर्चा सुरू झाली आहे. त्यामध्ये, लोकसभा निवडणूकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनाही संधी मिळण्याची शक्यता आहे. बीडमधील पराभूत उमेदवार पंकजा मुंडे, जालन्यातील पराभूत उमेदवार रावसाहेब दानवे आणि परभणीतील पराभूत उमेदवार महादेव जानकर यांच्या नावाची विधानपरिषदेच्या जागांसाठी चर्चा सुरू आहे.

# ई केवायसीसाठी तलाठी अंकिता जाधव यांचा उपक्रम

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**आष्टी अनुदानापासून कुठलाही शेतकरी वंचित राहू नये यासाठी ज्या शेतकऱ्यांनी ई केवायसी केली नाही त्यांना अनुदान मिळण्यासाठी अडचणी येऊ शकतात. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी ई केवायसी करावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.**

आष्टी तालुक्यातील कानडी खुर्द सज्जाचे तलाठी अंकिता जाधव यांनी या सज्जा अंतर्गत येणाऱ्या शिरापुर, पिंपळगाव दाणी व कानडी खुर्द या गावातील काही

## रुग्णांच्या घरी जाऊन राबवितात उपक्रम

शेतकऱ्यांचे ई केवायसी चे काम अपूर्ण होते. तलाठी अंकिता जाधव यांनी ९०% ई केवायसी चे काम पूर्ण केले असून अजून सदरील काम जोमाने सुरू आहे. गावातील लाभार्थी, गावचे सरपंच, सीएससी सेंटर व ऑपरेटर यांच्याशीही स्वतः संपर्क साधून अनुदानापासून कोणत्याही लाभार्थ्यांनी वंचित राहू नये यासाठी प्रयत्न केले आहे. या आधी ही शासनाचे विविध उपक्रम योगिता जाधव यांनी यशस्वी पणे राबविलेले आहेत. सज्जा अंतर्गत येणाऱ्या



गावात काही शेतकरी अपंग, वृध्द तसेच आजारी आहेत. अशा व्यक्तींची माहिती घेत तलाठी अंकिता जाधव यांनी त्यांच्या घरी जाऊन त्या लाभार्थ्यांची ई केवायसी करून घेतली आहे. ज्या लाभार्थी शेतकऱ्यांनी नैसर्गिक आपत्ती अतिवृष्टी अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी खातेदारांनी लवकरात लवकर जवळच्या सीएससी सेंटरमध्ये जाऊन ई केवायसी करुन घ्यावी असे आवाहन तहसील कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात सहभागी व्हा–ह.भ.प.हरीदास जोगदंड

बीड । प्रतिनिधी

**श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात आळंदी ते पंढरपुर सुरुवात होत असुन या आषाढी वारी पालखी सोहळ्यात विठ्ठलभक्त वारक–यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हा अध्यक्ष ह.भ.प. हरिदास भाऊ जोगदंड यांनी केले आहे. तसेच संत बंकट स्वामी महाराजांच्या दोन्ही दिंड्यांमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.**

जगद्गुरु संत श्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दिनांक २८/०६/२०२४ रोजी व श्री. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे दिनांक २९/०६/२०२४ रोजी प्रस्थान होणार आहे. प्रतिवर्षी या पालखी सोहळ्यात लाखो वारकरी भक्त मोठ्या संख्येने उपस्थिती असतात. टाळमृदुंगाची साथ, मुखी विठ्ठलाचे नामस्मरण करीत मल दरमजल चालणा–या वारक–यांसाठी सर्व स्तरातुन मदतीचा ओघ असतोच विशेष म्हणजे या वारीसाठी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर लोकांची उपस्थिती दिसून येऊ लागली आहे. विठ्ठल भक्तीची ओढ आणि विठ्ठल रुखमाईच्या दर्शनासाठी नाचत गात जो तो वारकरी हरिनामाच्या गजरात धुंद होताना दिसतो. मराठवाड्यातुन व बीड जिल्ह्यातुन श्री. संत ज्ञानेश्वर महाराज व श्री. संत तुकाराम महाराज यांच्या पालखीमध्ये हजारो वारकरी समाविष्ठ झालेले असतात. बीड जिल्हयातुन गेल्या चार वर्षापासुन मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग या दिंडीमध्ये सहभागी होताना दिसुन येऊ



लागला आहे. अखंड महाराष्ट्राचे दैवत आणि जात, पात धर्म पंथापासून दुर ठेवणारे वारक–यांच्या कुळात अनेक जण सहभागी होत आहेत. यातुनच वारकरी वैष्णवधर्म हा सामाजिक एकता निर्माण करण्यासाठी किती महत्वाचा आहे हे दिसुन येते. त्यासाठीच बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी वेगवेगळ्या दिंड्यामध्ये सहभागी होत मानवधर्माची पताका अटके पार फडकाविण्यासाठी या सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन अ. भा. वारकरी मंडळाचे जिल्हा अध्यक्ष ह. भ. प. हरिदास जोगदंड यांनी केले आहे. तसेच प्रत्येक वारक–यांनी आपआपल्या आंगणात एक झाड लावून वारीत सहभागी व्हावे व त्या झाडाचे संगोपण करावे.

## पान १वरून...

### दूध दरासाठी शेतकरी आक्रमक

राज्य सरकारने ही परिस्थिती लक्षात घेऊन नागपूर अधिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे दुधाला किमान ४० रुपये दर द्यावा, बंद केलेले दूध अनुदान पुन्हा सुरु करावे, वाढता उत्पादन खर्च व तोटा पाहता अनुदानात वाढ करून ते प्रति लिटर १० रुपये करावे तसेच अनुदान बंद काळात दूध घातलेल्या शेतकऱ्यांना या काळातील अनुदान द्यावे, या मागण्या दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती करत आहेत. राज्य सरकारने दूध उत्पादकांच्या या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. २८ जून २०२४ पासून सुरु होणाऱ्या या आंदोलनाची व्याप्ती राज्यभर विस्तारणार असून राज्य सरकारने या पार्श्वभूमीवर दूध उत्पादकांचा अधिक अंत पाहू नये, असे आवाहन समितीने केले आहे.

----------

### राजकीय वातावरण तापले;

खांडे यांच्याशी अद्याप संपर्क होऊ शकला नसून ते मुंबईत असल्याची माहिती त्यांच्या कार्यकर्त्यांकडून देण्यात आलेली आहे.

------------

### नीट पेपरफुटी प्रकरणी

अधिक विद्यार्थी ज्या परीक्षेवर आपलं भवितव्य ठरवतात यातील गैरप्रकार समोर आल्याने पालक आणि विद्यार्थी वर्गात प्रचंड रोष आहे. ही परीक्षा रद्द करुन फेरपरीक्षा घेण्याची आग्रही मागणी केली जात आहे.

**काँग्रेस विद्यार्थी संघटनेचा एनटीए इमारतीवर हल्लाबोल**

नीट परीक्षेतील गैर प्रकाराच्या निषेधार्थ काँग्रेसची विद्यार्थी संघटना एनएसयुआय ने गुरुवारी नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (एनटीए) कार्यालयावर धडक दिली. संस्थेच्या अनेक सदस्यांनी इमारतीत प्रवेश करून दरवाजे आतून बंद केल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेचे अनेक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यातील काही लोक एनटीए इमारतीत घुसून घोषणाबाजी करताना दिसत आहेत. एनटीए बंद करा, एनटीए मुर्दाबाद अशा घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह सुरक्षा दलांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

------------

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून

होता. पहिल्याच दिवसापासून विधिमंडळाच्या पायऱ्या आणि दोन्ही सभागृहांत विरोधकांची आक्रमक भूमिका पाहायला मिळाली. लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे पडसाद या अधिवेशनात जाणवत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानभवनात येताच त्यांच्यासमोर विरोधकांनी आक्रमक घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे, शेतकऱ्यांची वीजबिल माफ करा, कृषी मंत्र्यांच्या जिल्ह्यात बळीराजाचा बळी, अशा घोषणा विरोधकांनी दिल्या.

----------

### माजलगावचा क्लासवन

अहमदनगर येथे दि.१८ मार्च २०२४ रोजी ऑनलाईन अर्ज २५४५३१ या क्रमांकाने केला. सदर परवानगीसाठी लाचखोर पंकज जावळे याने लाचेची ९ लाख ३० हजार रुपये लाचेची मागणी केली व त्यास स्विय सहाय्यकाने प्रोत्साहन दिले. तक्रारदार यांना डॉ.जावळे आयुक्त आणि त्यांचे स्विय सहाय्यक देशपांडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने जालना एसीबीकडे धाव घेतली. १९ जून रोजी लाचेची पडताळणी करून आठ लाख रुपयांची लाचेची मागणी पुन्हा पंचसमक्ष केली. याप्रकरणी पोलीस ठाणे तोफखाना जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे आधिक्षक संदीप आटोळे, आले अधीक्षक मुकुंद आघाव, सहाय्यक सापळा अधिकारी शंकर मुटेकर, पोलीस अंमलदार गजानन घायवट, शिवाजी जमधडे, गणेश चेके, गणेश बुजाडे, शिवलिंग खुळे, अतिश तिडके, गजानन खरात विठ्ठल कापसे व भालचंद्र बिनोरकर यांनी केली.

------------

### पश्चिम महाराष्ट्रातल्या सहा

देशमुख हेदेखील उपस्थित होते अशी माहिती आहे. जयंत पाटलांची भेट घेणाऱ्या आमदारांपैकी दोन आमदार हे नाशिक भागातले असल्याची माहिती आहे. लोकसभेच्या निवडणुकीवेळी कांदा प्रश्न पेटला होता, त्याचा फटका महायुतीला बसला आणि अनेकांना पराभवाला सामोरे जावे लागले. ही परिस्थिती पाहता नाशिकमधील दोन आमदारांनी पुन्हा शरद पवारांकडे जाण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा सुरू आहे.

----------

### महाराष्ट्र गुजरातपेक्षा

३५ हजार ७६१ कोटी रुपये असल्याचे अहवालात म्हटले आहे. याशिवाय राज्यावरील कर्जात १६.५ टक्के इतकी वाढ झाल्याची माहिती देण्यात आली आहे. मार्च २०२४ अखेर राज्यावरील कर्जाचा आकडा ७ लाख ११ हजार २७८ कोटी रुपयांवर पोहचला असून कर्जाचे प्रमाण स्थूल राज्य उत्पन्नाच्या २५ टक्के आहे. मार्च २०२३ अखेर राज्यावर ६ लाख ४९ हजार ६९९ कोटी रुपये इतके कर्ज असेल, असा अंदाज गेल्या वर्षी वर्तविण्यात आला होता. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या गुरुवारच्या पहिल्या दिवशी सन २०२३–२४ या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी हा अहवाल दोन्ही सभागृहात मांडला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्याचा सन २०२४–२५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी आर्थिक पाहणी अहवालातून राज्य दरडोई उत्पन्न आणि कृषी उत्पादनातील घट याबाबत नकारात्मक चित्र समोर आल्याने अधिवेशनात विरोधी पक्षाच्या हाती आयते कोलीत सापडले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २८ जून २०२४


## वीज कोसळून मृत झालेल्या महिलांच्या निधनाबद्दल पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले दु:ख व्यक्त

मुंबई : बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील चकलांबा गावातील ३ महिलांचे आज शेतात काम करत असताना वीज कोसळून दुर्दैवी निधन झाले होते. या दुर्दैवी घटनेबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दुःख व्यक्त केले असून, या माऊलींच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे म्हटले आहे. आज दुपारी शेतात काम करत असताना अचानक वीज कोसळून ही दुर्घटना घडली होती. यामध्ये तीन महिलांचा दुर्दैवी अंत झाला असून, एक महिला सध्या रुग्णालयात उपचार घेत आहे.

दरम्यान जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी व जिल्हा प्रशासनाशी धनंजय मुंडे यांनी याबाबत चर्चा केली असून, संबंधित महिलांच्या कुटुंबियांना शासकीय नियमाप्रमाणे तातडीची मदत मिळवून देण्याबाबत प्रशासनास सूचना दिल्या आहेत.

----------


# धोतर, लुगड्यांच्या मागणीत मोठी घट फॅशनच्या दुनियेत पारंपरिक पोषाख कालबाह्य


**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव:**

ग्रामीण महाराष्ट्रात धोतर आणि लुगडं म्हटलं की डोळ्यासमोर उभी राहतात, ती महाराष्ट्रातील मराठमोळी जोडी आणि त्यांचा भारदस्त पेहराव! या वेशभूषेला देशभरात अनन्य साधारण महत्त्व असून भारतीय संस्कृतीत हा पारंपरिक पोषाख आहे. परंतु सध्या बदलत्या व फशनच्या युगात हा वस्त्रप्रकार कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे.

धोतर आणी लुगडं याची ग्राहकांकडून मागणीही घटली आहे. येणाऱ्या पिढीस धोतर आणि लुगडं केवळ चित्रपटातच पाहावयास मिळणार, अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. शहरी भागात धोतर वापरणाऱ्यांची संख्या पूर्वीपासूनच अगदी बोटांवर मोजण्याइतकी आहे. ग्रामीण भागातही तुरळक प्रमाणात जुनी मंडळी धोतर परिधान करतात, तेही क्वचितच प्रामुख्याने धोतराची लांबी ४.५ मीटर असते. कमरेभोवती गुंडाळून पायातून लपेटून घेऊन कमरेपाशी गाठ देऊन ते नेसले जाते. स्वातंत्र्याच्या कालखंडात खादी गांधी टोपी, नेहरू शर्ट किंवा कुर्ता व त्यावर धोतर परिधान असा पोशाख परिधान करण्याची पद्धत होती. आजही अनेक नेत्यांच्या अंगावर हा पोशाख दिसून येतो. बीड जिल्ह्यातील अनेक मोठ्या नेत्यांनी माजी उपमुख्यमंत्री स्व सुंदरराव सोळंके, माजी मंत्री शिवाजीराव पंडीत, माजी आमदार स्व. बाबुराव आडसकर, माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, माजी आमदार बाजीराव जगताप ही राजकीय मंडळी मोठ्या आवडीने धोतर नेसत असत. अलीकडे शहरी व ग्रामीण भागात ज्येष्ठ, तसेच सत्तरी गाठलेले देखील धोतर ऐवजी नाईट पँट व टी-शर्टमध्ये दिसत आहेत. असाच प्रकार भारदस्त लुगड्या बाबत झाला आहे. सध्याच्या स्त्रिया लुगडं नेसायला नाक-डोळे मुरडत आहेत. कारण लुगडं हे वजनाला भारी असते, शिवाय त्याची लांबीही अधिक







असते. त्यामुळे आता हे लुगडं नामशेष होऊ लागले आहे. एकंदरीत, धोतर आणि लुगडं कालबाह्य होण्याच्या मार्गावर असुन आताची धोतर आणी लुगडं नेसणारी पिढी ही शेवटचीच असणार आहे. त्यामुळे भविष्यात धोतर आणि लुगडं ही जोडी केवळ जुन्या चित्रपटात पाहावयास मिळेल.

स्वातंत्र्य चळवळीत काम करणाऱ्या नेत्यांचा धोतर हाच पोशाख होता.

धोतर हे एक भारतीय पारंपारिक वस्त्र आहे. धोतर, टोपी, कुर्ता असा मराठी माणसाचा पोशाख आहे. काळानुसार वस्त्र बदलले असले तरी आजही ग्रामीण भागातील बहुतांश नागरिक धोतर आणि टोपीच घालतात. भारतीय राजकारणावरही याच पोशाखाचा एकेकाळी प्रभाव होता. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल, पंतप्रधान लालबहादुर शास्त्री, पी. व्ही. नरसिंहराव, चंद्रशेखर, एच.डी. देवेगौडा यांचाही धोतर हाच पोशाख होता. ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, ते महात्मा गांधी हे तर गुडघ्यापर्यंत धोतर नेसायचे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत काम करणाऱ्या नेत्यांचा धोतर हाच पोशाख होता.

### धोतर घालणाऱ्यां मंत्री, नेत्यांचा राजकारणावर मोठा प्रभाव

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शिवाजीराव पाटील निलंगेकर, सुंदरराव सोळंके, यांना आठवताना त्यांचा पेहरावच पहिल्यांदा आठवतो. मराठी चित्रपटात अभिनेते निळू फुले, श्रीराम लागू यांच्याही राजकीय भूमिका धोतरावरच गाजल्या. ग्रामीण भागीतल सरपंचापासून ते पंतप्रधानापर्यंतचे सर्वच राजकारणी एकेकाळी धोतरच नेसायचे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात असे धोतर घालणारे नेते, मंत्री होते, ज्यांचा राजकारणावर मोठा प्रभाव राहिला.

## ह.भ.प.लक्ष्मण महाराज शेरकर यांचे वृद्धापकाळाने निधन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोगरा येथील रहिवासी व प्रत्येक आषाढी वारीत पात्रुड येथील ह.भ.प.भगवान बाबा महाराज यांच्या दिंडीतील सगळ्यात वयोवृद्ध विणेकरी म्हणून अवघ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले ह. भ.प.लक्ष्मण महाराज शेरकर यांचे वृद्धापकाळाने दि २७ जुन गुरुवार रोजी दुपारी २:०० वाजण्याच्या सुमारास निधन झाले. मुत्युसमयी त्मांचे वय १०२ वर्ष होते, ह.भ.प.लक्ष्मण महाराज शेरकर यांच्यावर त्यांच्या मुळगावी मोगरा येथील स्मशानभूमीत सायंकाळी ८:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील व परिसरातील वारकरी संप्रदायातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पाश्चात्य पुतणी, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.



## रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचा उपक्रम ;गरजू होतकरू महिलांना मोफत आटा चक्कीचे वाटप

माजलगांव । प्रतिनिधी

''रोटरी की आशा'' उपक्रमा अंतर्गत एका विशेष समारंभात शहरातील तीन गरीब होतकरू महिलांना रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल कडून मोफत व्यावसायिक आटा चक्कीचे वाटप करण्यात आले. बुखारी उर्दू स्कुल मध्ये झालेल्या या कार्यकमात प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक व व्यापारी महासंघांचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी यांचे हस्ते लाभार्थी शमशाद बेगम अजमोद्दीन श्रीमती गंगाबाई नारायण जाधव व गोरी बेगम शेख वहीद या तीन होतकरू महिलांना आटा चक्कीचे मोफत वाटप करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डिस्ट्रिक्ट उप प्रांतपाल डॉ.शंकर जुजगर हे होते.



यावेळी व्यासपीठावर रोटरी अध्यक्ष इम्रान नाईक, सचिव सुनील शिंदे, रो.अण्णासाहेब तौर, रो.डॉ.सुनील गरड, रो.पांडुरंग चांडक, रो.प्रा.नीलकंठ साबळे, रो.अंकुश राठोड, प्रोजेक्ट चेअरमन डॉ.वारकरी, रो.सुदर्शन थावरे, रो.समीर शेख, रो.उमाकांत सोळंके, रो.कैलास यलशेट्टी इत्यादी उपस्थित होते. प्रास्ताविकात रो.प्रभाकर शेटे यांनी रोटरी इंटर नॅशनल व रोटरीच्या विविध उपक्रमा बद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन असद शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन पांडुरंग चांडक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बुखारी उर्दू स्कुल मधील शिक्षक वृंद, शेख इरफान, रीझवान पटेल, असद शेख यांनी परिश्रम घेतले.

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या गव्हर्नर रो.स्वाती हेरकल यांच्या संकल्पनेतून साकार झालेला ग्लोबल ग्रॅण्ट प्रकल्प ''रोटरी की आशा'' या उपक्रमांतर्गत रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या वतीने रोटरी च्या विविध क्लब च्या माध्यमातून अहमदनगर सातारा सोलापूर सह मराठवाड्यातील गरीब होतकरू महिलांना २२५ आटा चक्कीचे नुकतेच वितरण करण्यात आले.

एकल महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी हा प्रकल्प राबवला गेला असून जर्मन तंत्रज्ञानाने परिपूर्ण व स्वयंचलित ही आटा मशीन २ एचपी क्षमतेची ताशी २५ किलो धान्य व मसाला यात दळता येईल अशा स्टेनलेस स्टील बॉडी असलेल्या तीन आटा चक्की डिस्ट्रिक्ट ग्रॅण्ट मधून माजलगाव रोटरी सेंट्रलसाठी मिळाल्या होत्या, त्याचे आज समारंभपूर्वक वितरण करण्यात आले.

# निसर्ग जपण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा -डॉ. हनुमंत सौदागर



**केज । प्रतिनिधी**

युवा ग्राम विकास मंडळ गेल्या २० वर्षापासून बोबाटी नदी विकास व पुनर्जीवन करिता काम करत आहे. आज सर्वज्ञ करियर अकॅडमी केज येथे युवा ग्राम विकास मंडळ व इंडिया वॉटर पार्टनरशीप यांच्या संयुक्त विद्यमाने युथ लीडरशिप ट्रेनिंग प्रोग्राम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वज्ञ करियर अकॅडमी चे संचालक प्रा. दत्ता बांगर, प्रमुख मार्गदर्शक डॉ. हनुमंत सौदागर हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संतोष रेपे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा समजावत जमलेल्या युवकांना पाठीमागील २ वर्षापासून करत असलेल्या कामाबाबत उजळणी केली व पुढे आपण काय करणार आहोत याबाबत नियोजन सांगितले.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. हनुमंत सौदागर यांनी आपल्या मार्गदर्शनातून जमलेल्या युवकांना नैसर्गिक साधन संपत्तीच्या होत असलेल्या ऱ्हासाबद्दल चर्चा केली. आपणच आपल्या पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास कसे रोखू शकतो व त्यावर काय उपाययोजना करायला हव्यात गावात बोबाटी नदी मधून वाहत जात असलेले पाणी कसे आढवले पाहिजे, शासकीय योजना व इतर योजनांचा अंमलबजावणी करत असताना आपण त्यात कोणती भूमिका घेतली पाहिजे, गावातील तरुण एकत्र येऊन आपण पिण्याचा पाण्यावर व शेतीच्या पाण्यावर काय काय उपाय योजना करू शकतो यावर डॉ. हनुमंत सौदागर यांनी जमलेल्या युवकांना मार्गदर्शन केले. पाण्याविषय जागरूक असणाऱ्या तरुण शेतकऱ्यांनी या बोबाटी नदीवरील बंधारे दुरुस्ती व पिण्याच्या पाण्याबद्दल सद्य स्थितीची माहिती दिली. शेतीच्या व पिण्याच्या पाण्याच्या जल स्त्रोतांचे बळकटीकरण करण्याकरिता युवकांचा सहभाग किती महत्वाचा आहे. व उद्याच्या शेतीवरील पाणी व्यवस्थापन हे युवकच करू शकतात. याबाबत युवा ग्राम विकास मंडळ युवकांना विविध प्रशिक्षणे देत आहे.

युवा ग्राम विकास मंडळ नदी काठच्या १० गावातून ३० युवकांचा गट तयार करून त्यांना जल स्त्रोतांचे पुर्नजीवन करण्यासाठी तज्ञ व्यक्तीकडून प्रशिक्षण देणार आहे. तसेच या युवकांची सहल देखील घेऊन जाणार आहे. अशी माहिती युवा ग्रामचे संतोष रेपे यांनी दिली. प्रा . दत्ता बांगर सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून जमलेल्या युवकांना नैसर्गिक संसाधन जोपासणे व ते टिकवून ठेवणे याबाबत मार्गदर्शन केले. शेवटी युवकांना प्रश्न उत्तरे विचारऱ्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश काळे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष रेपे संभाजी, व इतर यांनी प्रयत्न केले.

## सामाजिक स्थिरता येण्यासाठी राजर्षीशाहू महाराजांच्या विचारांची गरज -दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांच्या जयंती निमित्त भारतीय काँग्रेस अनु. जाती विभागाच्या वतीने विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी व मुखनायक या वृत्तपत्रासाठी सहकार्य करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधवत्तेचा सन्मान केला. तसेच १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना



प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. त्या काळाच्या तुलनेत ही प्रचंड विरोध झूगारून छत्रपती राजर्षीशाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची भूमिका पार पाडली, त्याच धर्तीवर वर्तमाणात सामाजिक सलोखा जपण्यासाठी छत्रपती राजर्षीशाहू महाराजांची सामाजिक न्यायायची समानता येण्यासाठी व सामाजिक स्थिरता येण्यासाठी वर्तमानात छत्रपती राजर्षीशाहू महाराजांच्या विचाराची गरज असल्याचे भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे आवाहन केले आहे. यावेळी भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे सह मानवी हक्क अभियानचे मधुकर कांबळे, युवराज डोईफोडे, अंशीराम कांबळे, अशोक शिंदे, बंडू खंडागळे, धुराजी कांबळे, अनिकेत कांबळे सह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## धारूर शहरात राजश्री शाहू महाराज जंयती विवीध सामाजीक उपक्रम राबवुन साजरी



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरात छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती उत्सव समितीचे वतीने विवीध सामाजीक उपक्रम राबवून शहरात राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या सर्व उपक्रमाना उस्फुर्त प्रतीसाद मिळाला .

धारूर शहरात राजश्री शाहु महाराज जयंती उत्सव समितीचे वतीने प्रतीवर्षी विवीध सामाजीक उपक्रमाचे आयोजन करून राजश्री शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली राजश्री शाहू महाराज चौकात काग्रेस आय चे जेष्ठ नेते प्रभाकरराव चव्हान यांचे हस्ते भगव्या ध्वजारोहण करण्यात आले येथै उपस्थित मान्यवराचे हस्ते प्रतीमापुजन करण्यात आले. त्या नंतर हुतात्मा स्मारका मध्ये रक्तदान शिबीराचा शुभारंभ करण्यात आला या शिबीराला उस्फुर्त प्रतीसाद मिळाला. त्यानंतर जि प माध्यमिक शाळा धारूर येथै गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वितरण करण्यात आले. यावेळी. काग्रेसचे जेष्ठनेते प्रभाकरराव चव्हाण, नगरसेवक बालाजी चव्हाण राजमूद्राचे सुरेशबप्पा शेळके, राष्ट्रवादी कांग्रेस चे शहराध्यक्ष नितीन शिनगारे पत्रकार अतुल शिनगारे, शिवसेनेचे तालूका प्रमुख बाळासाहेब कुरूंद, सुरेश गवळी अड मोहन भोसले, रोहीत चव्हाण, धंनजय कुलकर्णी बलभिम मुंडे, राधाकृष्ण गवळी, बाबा सराफ जि प मा शा मुख्याध्यापक जी के आकुसकर ज्ञानेश्वर शिंदे आदी मान्यवराची उपस्थीती होती. हे सर्व कार्यक्रम उत्साहात यशस्वी करण्या साठी उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्षक्ष बंडोबा संवत उत्सव समिती अध्यक्ष शरद सांवत आदीनी परीश्रम घेतले.

पान ६ वरून...

### तीन जुलै रोजी होणार

यांचे कार्य सादरीकरण होणार आहे.

बुधवार तीन जुलै २०२४ रोजी शिवाजी मंदिर नाट्यगृह दादर मुंबई येथे सकाळी नऊ वाजता संपन्न होत आहे. तसे पत्र प्रदेश सरचिटणीस व प्रशासन प्रमोदजी मोरे यांनी कॉंग्रेस पदाधिकारी व जिल्हा अध्यक्ष यांना पत्र पाठवले आहे. तरी एसटीएस कॉंग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी यांनी या विशेष भव्य सत्कार मेळाव्यास उपस्थित राहावे असे आवाहन एसटीएस कॉंग्रेसचे प्रदेश प्रमुख सुरेश यादव यांनी केले आहे.

### बीडच्या पाच खेळाडूंनी

आंध्र प्रदेश ०० गुण विरुद्ध महाराष्ट्र ६६ गुण , छत्तीसगड ०० गुण विरुद्ध महाराष्ट्र ३२ गुण, असे विजय मिळवून उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. उपांत्य पूर्व फेरीत झारखंड ०८ गुण विरुद्ध महाराष्ट्र १२ गुण प्राप्त करून उपांत्य फेरीत राजस्थान संघाकडून महाराष्ट्र संघास पराभव पत्करावा लागला. कास्य पदकसाठी महाराष्ट्र संघाची लढत मागील वर्षाच्या सुवर्णपदक विजेता बलाढ्य बिहार संघासोबत अतिशय चुरशीची लढत झाली. हा सामना पूर्ण वेळेत बरोबरी सुटला. सामन्याचा निकाल लावण्यासाठी, सुवर्ण गोल जास्तीच्या वेळात खेळवला गेला. यात महाराष्ट्र संघातील सर्व खेळाडूंनी अतिशय चुरशीचा खेळ केला, या सामन्यात बीडच्या सुरज येडे याने अंतिम गुण प्राप्त करून महाराष्ट्र संघास कांस्यपदक प्राप्त करून दिले.

कांस्यपदक विजेता महाराष्ट्र राज्य संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक भारत चव्हाण संघ व्यवस्थापक मुस्सद्दिक चौधरी आणि राज्य असोसिएशन चे सर्व पदाधिकारी यांचे राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी केल्या बद्दल, बीड जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष इसाक शेख , उपाध्यक्ष रमेश सानप, कोषाध्यक्ष श्री हरिभाऊ बांगर, सचिव श्री महेश घुले, कार्याध्यक्ष नितीन येळवे, मार्गदर्शन श्री भगवानराव बागलाने, श्री बालासाहेब जाधव सरपंच लिंबागनेश, श्री शिवराज देवगुडे साहेब, प्रशांत मुळे अप्पासाहेब शिंदे, बालासाहेब येवले, राजेभाऊ येडे, मनोजकुमार मोरे तसेच बीड जिल्हा रग्बी असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, अदनान शेख (राष्ट्रीय रग्बी खेळाडू) सर्व राज्य स्तरीय खेळाडू, सर्व पदाधिकारी आणि समस्त मोरया क्रीडा मंडळ परिवार बीड आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### सकाळी शाळा

आपल्या आई-वडिलांना त्यांच्या कामात मदत करण्यासाठी रस्त्यावर मांडलेल्या दुकानात येऊन बसतो. ज्यावेळी भाविक कमी असतात दुकानात बेल-फुल खरेदीला गिऱ्हाईक नसते असा वेळी तो आपल्या शाळेतील दिलेला गृहपाठ, शाळेचा अभ्यास पूर्ण करतो. मागील अनेक वर्षापासून दीपक याच पद्धतीने आपल्या आई-वडिलांना मदत करत आपले शिक्षण पूर्ण करत आहे. देशाला नवी दिशा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रस्त्यावरील दिव्यांच्या खाली बसून अभ्यास केल्याचं अनेक पुस्तकातून आपण वाचतो. अनेक क्रांतिकारकांनी तर तुरुंगातील प्रतिकूल परिस्थितीत पुस्तकं लिहिली. यावरून एवढच लक्षात येतं की, माशाचा डोळा हेच जर तुमचं लक्ष्य असेल तर आजूबाजूच्या कोणत्याच गोष्टींचा परिणाम होऊ शकत नाही. याचाच दाखला दीपक च्या वर्तनातून पुन्हा एकवेळ प्रकर्षांने जाणवतो.

### अंबाजोगाईचे बसस्थानक

अंबाजोगाई बसस्थानक छत्रपती संभाजीनगर प्रदेशातून प्रथम आले आहे. प्रदेशात अ, ब, क अशाप्रकारे बक्षीसाची वर्गवारी निश्चित करण्यात आली आहे. पहिल्या क्रमांकातील बसस्थानकासाठी १० लाख, द्वितीय साठी ५ तर तृतीय स्थानी राहिलेल्या बसस्थानकासाठी २.५ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येते. दरम्यान या मूल्यांकनासाठी विभागस्तरावर विभाग नियंत्रकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली आहे. यात विभागीय स्थापत्य अभियंता, उपयंत्र अभियंता, विभागीय कामगार अधिकारी व प्रवासी संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असतो. समितीकडून प्रत्येक दोन महिन्यांच्या अंतरात मध्यवर्ती समितीने ठरवून दिलेल्या विभागाची तपासणी होते. एकूण गुणांच्या ७५ टक्के पेक्षा जास्त गुण असणाऱ्या बसस्थानकांचा विचार या पुरस्कारासाठी केला जातो. मागीलवर्षी देखील अंबाजोगाई बसस्थानकाने प्रथम येण्याचा बहुमान नोंदवला आहे. छत्रपती संभाजीनगर प्रदेशातून दोन्ही वर्षी बीड विभागातील बसस्थानकाचा नंबर आला. सर्व चालक- वाहक, अधिकारी-कर्मचाऱ्यांचा हा सन्मान आहे.

- अजयकुमार मोरे, रापम विभाग नियंत्रक, बीड

### संत शेख महंमद महाराज

आदींसह समाज प्रबोधनपर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून या पालखी सोहळ्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे अवाहन संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचे सहसचिव ह.भ.प. सोमनाथ शेलार यांनी केले आहे. पालखी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी गणेश माळशिकारे, किरण बोन्द्रे, पोपट मेटे, विजय महाराज घोंगडे, कल्याण गोंगडे आदी पसरिश्रम घेत आहेत.

संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचा १,००० झाडे लागवडीचा संकल्प ...

वातावरणातील तापमान वाढ आणि बदल लक्षात घेता झाडे लागवड आणि त्यांचे संवर्धन करण्याचे काम आपल्या पिढीला करावे लागणार आहे, हे वास्तव लक्षात घेऊन प्रतिष्ठानच्या माध्यमातून या उपक्रमास चालना दिली जाणार आहे. त्यासाठी पालखी मार्गावर, अन्नदाते आणि भाविकांच्या घराजवळ, बांधावर झाडे लागवडीचा प्रयोग केला जाणार आहे. पालखी सोहळ्यात १,००० झाडे लागवडीचा संकलप करण्यात आला आहे. चिंच , जांभूळ, वड, लिंबूवर्गीय झाडांची लागवड केली जाणार आहे. याकामी श्रमदान मंडळ, मिरजगाव येथील स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. या पर्यावरणपूरक दिंडीत मोठ्या संख्येने पर्यावरणप्रेमींनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रतिष्ठानचे सचिव ह.भ.प. किसन महाराज आटोळे ह्यांनी केले आहे.

### अल्पवयीन मुलगी

अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी पोलीसांत धाव घेऊन बेपत्ता झाल्याची नोंद केली. तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञात कारणासाठी पळवुन नेल्याचा आपल्याला संशय असुन मुलीचा शोध घेऊन अज्ञात ईसमाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी या बेपत्ता मुलीच्या वडिलांनी केली आहे.

### प्रा. डॉ. गजानन सवने

करतात. या पुरस्कार प्रदान समारंभाचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार विजेते ऍड. गोरखनाथ बलकवडे तर प्रमुख पाहुणे ऑलम्पिक निरीक्षक अशोक दुधारे, प्रा. डॉ. बलवंत सिंह, सुशील देशमुख यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल कामधेनू संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब देशमुख, सचिव व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य गोविंदराव देशमुख, प्राचार्य डॉ. अरुण दळवे उपप्राचार्य डॉ. अर्जुन मोरे प्रा. डॉ.मनीषा देशमुख ,कार्यालयीन अधीक्षक उमेश सरनाईक प्रा. डॉ. पांडुरंग रणमाळ सह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### फार्मसी महाविद्यालयात

याप्रसंगी प्राचार्य संतोष तरके यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांनी केलेल्या सामाजिक व राजकिय कार्यावर उजाळा टाकला. महाविद्यालयात जयंती साजरी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभाग प्रमुख प्रा. मामुन सुरेशी यांनी पुढाकार घेतला होता. जयंती साजरी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या मदतीचे वाटप ३० जूनपर्यंत पूर्ण करा

## मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला निर्देश

मुंबई : राज्यातील शेतकरी, नागरिक यांना नैसर्गिक आपत्ती, शेती नुकसान भरपाईसाठीची मदतीचे वाटप दि. ३० जूनपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी येथे दिले. शेतकऱ्यांना वेळेवर मदत दिली पाहिजे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी तातडीने करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले. खते, बियाणे याचे लिंकेज करणाऱ्या विक्रेत्यांबरोबरच कंपन्यांवरही कडक कारवाई करण्याच्या सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी कृषी विभागाला दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत राज्यातील खरिपाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतकरी देशाचा कणा आहे. त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी घेतलेल्या निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. राज्य शासन शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही, असे सांगतानाच बांबू लागवड क्षेत्राची वाढ करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कृषी विद्यापीठांनी नवीन संशोधनावर भर द्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ज्या भागात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे असे तालुके, जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रत करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. बोगस बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करावी. आपत्ती काळात



शेतीच्या नुकसानीच्या पाहणीसाठी सॅटेलाईट तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी ते केले. कृषी अधिकाऱ्यांनी क्षेत्रीयस्तरावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. हवामान विभागाने जुलै महिन्यात ला निना मुळे जोरदार पाऊस होण्याचा अंदाज वर्तविला आहे. अशा परिस्थितीत आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी दिल्या. खरिपाच्या काळात शेतकऱ्यांना बियाणे खते व अन्य कृषी निविष्ठांचा तुटवडा भासू नये यासाठी कृषी विभागाने परिपूर्ण नियोजन केलेले आहे. मात्र साठेबाजी किंवा लिंकिंग होत असल्यास तशी तक्रार शेतकऱ्यांनी व्हाट्स अपद्वारे ९८२२४४६६५५ या क्रमांकावर करावी असे आवाहन कृषिमंत्री श्री.मुंडे यांनी प्रास्ताविक करताना केले.डीएपी खतांचा २५ हजार मे. टन साठा संरक्षित

यंदा खरीपाचे लागवडीखालील अपेक्षित क्षेत्र १४२.३८ लाख हेक्टर राहणार असून यामध्ये कापूस पिकाखाली ४०.२० लाख हेक्टर, सोयाबीन पिकाखाली ५०.८६ लाख हेक्टर, भात पिकाखाली १५.३०लाख हेक्टर, मका पिकाखाली ९.८० लाख हेक्टर, कडधान्य पिकाखाली १७.७३ लाख हेक्टर क्षेत्र येणार आहे. राज्यात २४.९१ लाख क्वि. बियाणे उपलब्ध असून १.५० लाख मे. टन युरिया व २५ हजार मे. टन डीएपी खतांचा संरक्षित साठा करण्यात आल्याची माहिती प्रधान सचिव श्रीमती राधा यांनी दिली.

## पुणे जिल्ह्यात १८ लाख ८४ हजार जनावरांचे लसीकरण



पुणे : पावसाळ्यापूर्वी जनावरांमधील विविध आजारांच्या लसीकरणाची मोहीम पुणे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी हाती घेतली होती. जिल्ह्यात आत्तापर्यंत १८ लाख ८४ हजार २०५ जनावरांना विविध आजारांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विष्णू गर्जे यांनी दिली.

जिल्ह्यात एकूण २० लाख ११ लाख ४३१ एवढे गाय, म्हैस, बैल आणि शेळ्या मेंढ्या आहेत. यामध्ये गाय म्हैस आणि बैलाची संख्या ही ११ लाख ४४ हजार ८९३ एवढी आहे. तर शेळ्या मेंढ्यांची संख्या ८ लाख ६६ हजार ५३८ एवढे आहेत. मात्र, गेल्या काही वर्षात जनांवरामधील लम्पी स्किन, घटसर्प, फऱ्या, पीजीआर अशा विविध आजारांनी डोके वर काढले आहे.

या आजारांमुळे अनेक जनावरे दगावतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ते होऊ नये, यासाठी पुणे जिल्ह्यात पावसाळ्यापूर्वी जनावरांमधील घटसर्प, फऱ्या, तर शेळ्यांमधील आंत्रविषार, पीजीआर लम्पी स्किन अशा आजारांवर लसीकरण करण्यात येऊ लागले आहे. यंदाही या आजारांवरील लसीकरणाची मोहीम राबविण्यात आली आहे. जून महिना लागल्याने त्याचा फायदा दिसून येतो. त्यामुळे या आजारामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी होते. गेल्या एक महिन्यापासून जिल्ह्यातील अनेक भागांत लम्पी स्किन या आजाराचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जनावरांचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. उष्ण व आर्द्र हवामानात या रोगाचा जास्त प्रसार होतो. या रोगाची बाधा गाय व म्हैस वर्गातील सर्व वयोगटाच्या जनावरांना होते. लहान वासरांमध्ये रोगाची तीव्रता अधिक दिसून येते. या रोगाचा प्रसार साधारण १० ते २० टक्के जनावरांमध्ये होतो. देशी जनावरांपेक्षा संकरीत जनावरे या विषाणूला लवकर बळी पडतात. त्यामुळे चालू वर्षी तब्बल पाच लाख ४८ हजार ५३५ शेळ्या, मेंढ्यांना लम्पी आजाराचे लसीकरण करण्यात आले आहे. तर, पीजीआरचे सात लाख ४१ हजार ४२४, आंत्र विषाराचे १ लाख ४८ हजार ४८२ शेळ्या मेंढ्यांना लसीकरण करण्यात आले आहे. जनावरांमधील घटसर्प आणि फऱ्याचे चार लाख ४५ हजार ७६४ जनावरांचे लसीकरण केले आहे.

## मध व्यवसायासाठी मिळते ५० टक्के अनुदान

मध योजना ही महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविली जाणारी योजना आहे. यात मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, साहित्य स्वरूपात ५० टक्के अनुदान (५०%), शासनाच्या हमी भावाने मध खरेदी, विशेष प्रशिक्षणाची सुविधा, मधमाशा संरक्षण व संवर्धनाची जनजागृती आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

लाभार्थ्यांसाठी आवश्यक अटी : यातील वैयक्तिक मधपाळ योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार साक्षर असावा. स्वत:ची शेती असल्यास प्राधान्य, वय १८ वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. केंद्र चालक प्रगतिशील मधपाळ योजनेसाठी लाभार्थी वैयक्तिक केंद्र चालक असावा. किमान १० वी उत्तीर्ण असावा, २१ वर्षांपेक्षा जास्त वय असावे. अशा व्यक्तींच्या अथवा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तींच्या नावे किमान एक एकर शेती किंवा भाडे तत्त्वावर घेतलेली शेतजमीन असावी. लाभार्थीकडे मधमाशापालन, प्रजनन व मध उत्पादनाबाबतीत लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असावी. केंद्र चालक संस्था योजनेसाठी संस्था नोंदणीकृत असावी. संस्थेच्या नावे किंवा १० वर्षांसाठी



भाडे तत्त्वावर घेतलेली किमान एक एकर शेतजमीन असणे आवश्यक आहे.

एक हजार चौरस फूट इमारत असावी यासह इतर अटींचे पालन करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

## शक्तिपीठ महामार्ग रद्द करा, शेतकऱ्यांची पदयात्रा

कोल्हापूर : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ठरल्याप्रमाणे १०० व ५० रुपयांचा दुसरा हप्ता मिळावा तसेच शक्तिपीठ महामार्ग रद्द व्हावा. यासाठी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त कागल ते कोल्हापूर पायी कैफियत पदयात्रा काढण्यात आली.




या वेळी माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, की सरकारने शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळलेला नाही. सध्या जाहीर केलेला हमीभाव ही केवळ तडजोड आहे. सबसिडी देऊन भाव नियंत्रित करत असल्यामुळे शेतकरी देशोधडीला लागलेला आहे. सरकारने शेतकरी हिताचे निर्णय घ्यावेत यासाठी ही कैफियत यात्रा काढली असल्याचे त्यांनी सांगितले.

राजू शेट्टी म्हणाले, मागील वर्षी तुटलेल्या उसाची एफआरपी अधिक १०० रुपये मिळावेत अशी आमची मागणी होती. त्यासाठी आम्ही शेतकऱ्यांनी महामार्ग रोखला. ज्या कारखान्याने तीन हजार रुपये दिले त्यांनी जादा पन्नास रुपये शेतकऱ्यांना द्यायचे अशी मागणी ठरली होती. त्या वेळी हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. तो जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने मिटवण्यात आला होता. परंतु राज्य सरकारने याला परवानगी न दिल्याने शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत. या वेळी राजू शेट्टी यांनी जुलैपासून शेतकरी कर्ज मुक्ती आंदोलन करणार असून, त्यासाठी राज्याचा दौरा करणार असल्याचे सांगितले.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३८ : इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाचा राज्याभिषेक झाला.
१८४६ : ॲडॉल्फ सॅक्स याने पॅरिस, फ्रान्समधे 'सॅक्सोफोन' या वाद्याचे पेटंट घेतले.
१९२६ : गोटलिब डेमलर आणि कार्ल बेन्झ यांनी त्यांच्या दोन कंपन्यांचे एकत्रीकरण करून मर्सिडीज-बेंझची स्थापना केली.
१९७२ : दुसऱ्या भारत-पाक युद्धानंतर सिमला परिषदेस प्रारंभ
१९७८ : अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने महाविद्यालयातील प्रवेशात आरक्षण बेकायदा ठरवले.
१९८१ : चीनने कैलाश मानसरोवर यात्रा करण्यासाठी सडक मार्ग उघडला.
१९८६ : अविवाहित मुलींनाही प्रसूती रजा देण्यासाठी केंद्र सरकारने कायदा केला.
१९९४ : विश्वकरंडक फूटबॉल स्पर्धेत रशियाच्या ओलेग सेलेन्को याने कॅमेरुनविरुद्ध पाच गोल करुन ऐतिहासिक कामगिरी केली. यापूर्वी एकाच सामन्यात चार गोल करण्याची कामगिरी नऊ खेळाडूंनी केली होती.
१९९५ : वाघांना शिकाऱ्यांपासून वाघांचा बचाव करण्यासाठी व त्यांना आश्रय देण्यासाठी मध्यप्रदेश राज्याला 'टायगर्स स्टेट' म्हणून घोषित करण्यात आलं.
१९९७ : मुष्टियुद्धात इव्हान्डर होलिफिल्डच्या कानाचा चावून तुकडा तोडल्यामुळे माईक टायसनला निलंबित करुन होलिफिल्डला विजेता घोषित करण्यात आले.
१९९८ : संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९१ : हेन्री (आठवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २८ जानेवारी १५४७)
१७१२ : रुसो फ्रेन्च विचारवंत, लेखक व संगीतकार (मृत्यू: २ जुलै १७७८)
१८८३ : साली भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते आणि महात्मा गांधी काशी विद्यापीठाचे संस्थापक तसचं, हिंदी वृत्तपत्र "दैनिक आज" चे संस्थापक शिवप्रसाद गुप्त यांचा जन्मदिन.
१९२१ : नरसिंह राव भारताचे ९ वे पंतप्रधान, वाणिज्य व उद्योगमंत्री (मृत्यू: २३ डिसेंबर २००४)
१९२८ : बाबूराव सडवेलकर चित्रकार, कलासमीक्षक, महाराष्ट्राचे कलासंचालक (मृत्यू: २३ नोव्हेंबर २०००)
१९३४ : रॉय गिलख्रिस्ट कसोटी क्रिकेटमधील भेदक वेगवान गोलंदाज म्हणून कारकीर्द गाजवलेले वेस्ट इंडीजचे वादग्रस्त कसोटीपटू (मृत्यू: १८ जुलै २००१)
१९३७ : डॉ. गंगाधर पानतावणे साहित्यिक व समीक्षक
१९७० : मुश्ताक अहमद पाकिस्तानी क्रिकेटपटू व प्रशिक्षक
१९७६ : पद्मश्री पुरस्कार व अर्जुन पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट भारतीय नेमबाज जसपाल राणा यांचा जन्मदिन.
१९९५ : पद्मश्री पुरस्कार व अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय पॅरालंपिक उंच उडी खेळाडू मरियप्पन थान्गावेलु यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३६ : जेम्स मॅडिसन अमेरिकेचे चौथे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १६ मार्च १७५१)
१९९० : कवी प्रा. भालचंद खांडेकर यांचे निधन.
१९७२ : प्रसंत चंद्र महालनोबिस भारतीय संख्याशास्त्राचे जनक, 'इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युट' चे संस्थापक (जन्म: २९ जून १८९३)
१९८७ : पं. गजाननबुवा जोशी शास्त्रीय गायक (जन्म: ३० जानेवारी१९११)
१९९९ : रामचंद्र विठ्ठल तथा रामभाऊ निसळ स्वातंत्र्यसैनिकांचे नेते व झुंजार पत्रकार (जन्म:)
२००० : विष्णू महेश्वर ऊर्फ 'व्ही. एम.' तथा दादासाहेब जोग उद्योजक (जन्म: ६ एप्रिल १९२७)
२००६ : संत साहित्यकार, समीक्षक, वक्ते डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे निधन.
२००७ : जपानच्या पूर्व पंतप्रधान कीची मियाजावा यांचे निधन.
२००९ : भारतीय दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक ए. के. लोहितदास यांचे निधन. (जन्म: ६ मे १९५५)

# सरकारचं धोरण बदलणार का? तांदळावरील निर्यातबंदी हटणार का?

तांदळाचे दर वाढू नयेत म्हणून सरकारनं तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. मात्र, आता ही तांदळाच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

शेतमालाच्या किंमती नियंत्रीत राहाव्यात म्हणून सरकार विविध धोरणं राबवत आहे. तांदळाचे दर वाढू नयेत म्हणून सरकारनं तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. मात्र, आता ही तांदळाच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याची मागणी जोर धरु लागली आहे. तांदळावरील बंदी उठवावी अशी मागणी व्यापाऱ्यांनी सरकारडं केलीय. मात्र, आतापर्यंत निर्यातीवरील बंदी उठवण्याबाबत सरकारकडून कोणतेही संकेत मिळालेले नाहीत.

### आवश्यक मर्यादेच्या साडेतीन पट अधिक तांदळाचा साठा

तांदूळ व्यापाऱ्यांनी तांदळाच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याची मागणी तीव्र केली आहे. भारतीय अन्न महामंडळकडे तांदळाचा पुरेसा साठा जमा झाला आहे. व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, एवढा तांदूळ सध्या एफसीआयकडे साठवला आहे, जो सुरक्षित साठवणुकीसाठी आवश्यक मर्यादेच्या साडेतीन पट आहे. अशा परिस्थितीत आता निर्यातबंदी उठवायला हवी, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. मर्यादेपेक्षा तांदळाचा अधिक साठा असतानाही निर्यात का नाही? असा सवाल व्यापाऱ्यांनी केलाय.

तांदूळ व्यापाऱ्यांनी अलीकडेच निर्यातीवरील बंदी उठवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेतल्याचे अहवालात म्हटले आहे. केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांसोबत मंगळवारी झालेल्या बैठकीत तांदूळ व्यापाऱ्यांनी आपले म्हणणे मांडले आणि तांदळाच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याची विनंती केली. तांदळाच्या निर्यातीच्या बाबतीत सरकारनं निर्यात मूल्यावर २० टक्के शुल्क लावण्याऐवजी प्रमाणानुसार शुल्क आकारावे. जेणेकरून शिपमेंटचे अवमूल्यन होण्यापासून वाचता येईल, अशी विनंतीही व्यापाऱ्यांनी केली आहे.

### तांदळाच्या किमतीत सातत्याने वाढ झाल्यानंतर घातली होती निर्यातबंदी


तांदळाच्या किमतीत सातत्याने वाढ झाल्यानंतर सरकारने निर्यातीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. गेल्या वर्षीपासून तांदळाची घाऊक महागाई सातत्याने १० टक्क्यांहून अधिक राहिली होती. सरकारने ऑगस्ट २०२२ मध्ये तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये गैर-बासमती तांदळाची निर्यात बंद करण्यात आली. त्याच वेळी, ऑगस्ट २०२३ पासून, रिफाइन्ड तांदळावर २० टक्के निर्यात शुल्क आणि बासमती तांदळावर किमान निर्यात दराचे निर्बंध आहे.

### निर्यात सुरु ठेवल्यास शेतकऱ्यांना मिळतो फायदा

शेतमालाच्या बाबतीत सरकार सातत्यानं धोरणं बदलत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. निर्यातीवर बंदी असल्यामुळं शेतकऱ्यांना तांदळाचा चांगला पैसा होत नाही. परदेशात तांदळाची निर्यात झाल्यास शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळतात.मात्र, देशांतर्गत तांदळाच्या किंमती नियंत्रीत ठेवण्यासाठी सरकार सातत्यानं निर्यातबंदीचा पर्याय अवलंबत आहे. दरम्यान, कांद्याच्या बाबतीत देखील सरकारनं असाच निर्णय घेतला होता. बाजारात कांद्याचे दर वाढायला लागले की सरकारन कांद्याची निर्यातबदी केली. या निर्यातबंदीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. ५०, ६० रुपये किलोवर गेलेला कांदा ५ ते १० रुपये किलोवर आला होता. शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता.

### सरकारनं डिसेंबर २०२३ मध्ये कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती

सरकारनं डिसेंबर २०२३ मध्ये कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. मार्च महिन्यात कांद्यावरील बंदी उठवण्याचे जाहीर देखील केले होते. मात्र, सरकारनं मार्चमध्ये कांद्यावरील बंदी उठवलीच नाही. अखेर सरकारनं ४ मे रोजी कांद्यावरील बंदी उठवण्याचा निर्णय घेतला. परणामी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.



# नदीपात्रात चोरटे लपले; मग लोकांनी पात्रच स्वच्छ केले

## बीडमधील प्रकार : वाढत्या चोऱ्यांमुळे भीतीचे वातावरण





बीड । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या अंकुशनगर भागात चोरट्यांनी मागील पंधरा दिवसांपासून धुमाकूळ घातला आहे. रात्रीच्या वेळी नागरिक पाठलाग करत असल्याने चोरटे याच भागातील नदीपात्रात लपून बसल्याचे वारंवार समोर आले. त्यावर नागरिकांनी शक्कल काढत लोकवर्गणी करून जेसीबी लावून नदीपात्रातील झाडेझुडपे बाजूला केली. चोरांच्या भीतीपोटी हा उपक्रम राबविला.

बीड शहरातील अंकुश नगर भागात घरांची संख्या वाढली असली तरी परिसर संपल्यानंतर मोकळा परिसर आहे. त्यामुळे चोरट्यांना चोरी करून पळण्यास संधी प्राप्त होते. दरम्यान, अंकुश नगर भागात जवळपास १५ दिवसांपूर्वी कपिल मुनी परिसरात एका घरी चोरी झाली होती, त्यानंतर रात्रीच्या वेळी चोरटे नेहमीच दिसून येऊ लागले, एका ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरटे कैद झाले होते. चोरट्यांचा रात्रीच्या वेळी संचार वाढल्याने नागरिकांनी गस्त घालण्यास सुरुवात केली. चोरटे दिल्यानंतर त्यांचा नागरिकांनी पाठलाग केला असता चोरटे अंकुश नगर पुलाजवळ असलेल्या नदीपात्रातील काट्याकुपाट्यात लपून बसू लागले. असा प्रकार दोन ते तीन वेळा समोर आला. एका दिवशी तर नदीपात्रात लपलेल्या एका चोरट्याने नागरिकांना 'खाली या, तुमचे पाहतो' असे आव्हानच दिले. त्यामुळे भयभीत झालेल्या नागरिकांनी वर्गणी गोळा करीत जेसीबी लावून पात्र स्वच्छ केले.

अंकुशनगर भागातील नदीपात्राची स्वच्छता मागील दहा वर्षांपासून करण्यात आलेली नाही. त्यामुळे अंकुशनगर येथील वैकुंठधाम स्मशानभूमी परि- सरातील नदीपात्रात मोठ्या प्रमाणात कचरा साचला असून, झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे दिसून येत आहे. नदीपात्रातील झुडपे काढण्याचे काम सुरू आहे. चोरटे नदीपात्रात येऊन लपून बसत असल्याने नागरिकांनी एकत्र येऊन नदीपात्रातील झुडपे काढण्याचा निर्णय घेतला. पहिल्या दिवशी अंकुशनगर येथील वैकुंठधाम स्मशानभूमीसमोर असलेल्या नदीपात्रातील झाडेझुडपे काढण्यासाठी लोकवर्गणी काढण्यात आली. त्यानंतर मंगळवारी सकाळी ११ वाजता सुरु झालेले काम मध्यरात्री १२:३० वाजेपर्यंत चालले. त्यानंतर बुधवारी सकाळी सहा वाजेपासून पुन्हा याच कामाला सुरुवात झाली. सायंकाळपर्यंत हे काम सुरू होते. नदीपात्रातील झाडाझुडपासह कचरासुद्धा काढण्यात आली. चोरट्यांनी अंकुशनगर परिसर टार्गेट केला आहे. अंकुशनगर, नाथ सृष्टी व लोढानगर परिसरातील नागरिकांनी लोकवर्गणी करून नदी स्वच्छतेचे काम हाती घेतले आहे. पोलिसांनी लोकभावना लक्षात घेऊन या भागात गस्त वाढवावी, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली. नदीपात्र स्वच्छ करण्यासाठी नगर पालिकेकडे पाठपुरावा केला होता, त्यांच्याकडे जेसीबीची मागणी केली होती, परंतु जेसीबी नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेत लोकवर्गणीतून पात्र स्वच्छ करणे सुरू केले आहे.



चोरट्यांच्या भीतीपोटी नदीपात्र स्वच्छ करण्यात येत आहे. दोन दिवसांत बऱ्यापैकी नदीपात्र स्वच्छ झाले आहे. झाडेझुडपे जेसीबीच्या साहाय्याने बाजूला केली जात आहेत.

अ‍ॅड.आदर्श अरुणराव जाधव
मराठवाडा अध्यक्ष: महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना

## थोडक्यात

### नंदकुमार शेटे यांचे निधन



अंबाजोगाई : येथील नवा मोंढा परिसरातील ज्येष्ठ व्यापारी नंदकुमार शाहलिंगअप्पा शेटे (वय ६५ वर्षे) यांचे मंगळवार, दिनांक २५ जुन रोजी रात्रीच्या समयी अल्पशा आजाराने निधन झाले. नवा मोंढा परिसरातील ज्येष्ठ व्यापारी नंदकुमार शेटे हे मंगळवार पेठ येथील रहिवासी आहेत. मंगळवारी रात्री ११ वाजेच्या समयी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दिनांक २६ जुन रोजी दुपारी २ वाजता लिंगायत स्मशानभूमी, बाराखांबी परिसर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, अंबाजोगाई शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते.

### निवडणुकीच्या लेख्यांची पोहोच पावती निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी घ्यावी

बीड : निवडणूक आयोगाने निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांची तपासणीची कार्यपध्दती विशद केलेली आहे त्यानुसार उमेदवाराने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांसमोर निवडणूक खचर्चाचे लेखे समावेश असलेली नोंदवही, रोख नोंदवही, दैनंदिन खाते नोंदवही, संक्षिप्त विवरणपत्र (भाग १ ते ४ आणि अनुसूचित १ ते ११) सर्व देयके व प्रमाणके (अनुक्रमांक दिलेले) आणि मुळ प्रतीतील शपथपत्र, केवळ खर्चाच्या प्रयोजनासाठी उघडण्यात आलेले बँकेच्या विवरणपत्राची सर्व बाबतीत यथोचीतरित्या भरलेली आणि स्वंय साक्षांकित प्रत्? निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सादर करणे बंधनकारक असते. जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात लेखे दाखल केल्याचा दिनांक व वेळ देऊन लेखे दाखल केल्याचा पुरावा म्हणून पोहोच पावती घ्यावी.जर लेखे विहीत वेळेत आणि आवश्यक रीतीने सादर केले नाहीत तर, आयोगाकडून लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये अनर्हतेची नोटीस जारी करण्यात येईल, असे ३९बीड लोकसभा मतदारसंघ जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले.

### ज्ञानराधाच्या संचालक मंडळाविरोधात परळीत गुन्हा

परळी : राजस्थानी मल्टिस्टेटच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल झाल्यानंतर आता ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालक मंडळावर लाखो रुपयांची फसवणूक केल्याबद्दल शहरातील संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार ठेवीदारांनी ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटी मध्ये आपल्या मेहनतीने कमावलेला पैसा मुदत ठेवी करण्यासाठी ठेवला होता.सन २०१६ ते आजमितीला ठेवीदारांनी तब्बल ७८ लाख ६५ हजार ७२० रु च्या ठेवी ठेवल्या मात्र मुदतीनंतर देखील ठेवलेल्या ठेवी परत मिळत नसल्याने बँक ऑफ महाराष्ट्रचे सेवानिवृत्त कर्मचारी नरहारी मारूतीअप्पा टेकाळे (वय ६९ वर्षे) यांनी संभाजी नगर पोलीस ठाण्यात ज्ञानराधा मल्टिस्टेटचे चेयरमन सुरेश कुटे, गोविंद साखरे व इतर संचालक मंडळी व कर्मचारी यांच्या विरोधात गुरनं १०६/२०२४ कलम ४२०,४०६,३४ भादवी सह कलम महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण अधि १९९९ चे कलम ३,४ नुसार गुन्हा दाखल केला असून याप्रकरणी अधिक तपास ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

### निवडणूक खर्चच्या ताळमेळसाठी पुनर्मेळ बैठक

बीड : निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या अनुदेशाप्रमाणे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांची तपासणीची कार्यपध्दती विशद केलेली आहे. त्याप्रमाणे सारसंग्रह जोडपत्र सी-१० व सी-१२ नुसार निकालाची घोषणा केल्याच्या नंतर २६ व्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडून आयोजीत करण्यात आलेल्या लेखा पुनर्मळ बैठकीमध्ये उमेदवारास निवडणूक खर्चासाठी नमूद केलेल्या रक्कमेचा कोणतीही तफावत असल्यास पुनर्मळ घालण्याची दुसरी संधी देण्यात येते. त्यामुळे उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी त्यांच्या निवडणूक खर्चाच्या खात्यामध्ये निवडणूक खर्चाच्या बाबी संदर्भात काही विवाद असेल तर निवडणूकीच्या कालावधीमध्ये गोळा केलेल्या पुराव्यासह मेळ घालू शकतात.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित झाले नाहीतर आम्हाला मते मागू नका -कुलकर्णी

केज । प्रतिनिधी

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या निर्णय समितीची रविवार दि २३ जुन रोजी छत्रपती संभाजी नगर येथे विजयाताई कुलकर्णी यांच्या घरी झाली यामधे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला की परशुराम आर्थिक विकास महामंडळ या अधिवेशनात कार्यान्वित झाले नाहीतर गृहीत धरणाऱ्या पक्षासह सत्ताधारी पक्षाना ब्राम्हण आपले उपद्रवमुल दाखवतील. छत्रपती संभाजी नगर येथे रविवार दि २३ जुन रोजी समस्त ब्राह्मण समाज समितीची बैठक झाली यामधे धनंजय कुलकर्णी केज , दिपक रणनवरे जालना , श्रीकांत जोशी अकोला , इश्वर दिक्षीत बुलढाणा , विजयाताई कुलकर्णी छत्रपती संभाजी नगर , दिपाली देशपांडे पुणे , अनिल डोईफोडे नांदेड हे निर्णय समिती प्रमुख उपस्थित होते. यावेळी बैठकीत १४ डिसेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली त्यानंतर १ फेब्रुवारी २०२४ रोजी इतिवृत्त तयार झाले परंतु त्यानंतर अद्यापही प्रस्ताव सादर करून परशुराम आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित केलेले नाही.

परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी विशेष अधिवेशन घेण्याची आवश्यकता नाही , त्यासाठी स्वतंत्र बैठक बोलावण्याची आवश्यकता नाही तरी देखील ब्राह्मण समाज या महाराष्ट्राचा आहे हे सत्ताधारी मानायलाच तयार नाहीत असा अर्थ निघत आहे. विनाकारण सरकार परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी टाळाटाळ करत आहेत भारतीय जनता पक्ष ब्राम्हणाला गृहीत धरतो की यांना काही नाही दिले तरी मतदान मिळणारा एकमेव समाज आहे ब्राह्मण त्यामुळे ब्राह्मण समाजाचा विचार करण्याची त्यांना आवश्यकता नाही , भाजप मधील ब्राह्मण नेतृत्व स्वतःची तुंबडी भरून घेण्यात व्यस्त आहेत तर पदाधिकारी पक्षाचे गुलाम म्हणून वागतात आणि बुद्धीभेद करण्यात सराईत आहेत तर शिवसेना हिंदूत्वाच्या मुद्द्यावर ब्राह्मण आपल्याला मतदान करतो अस गृहीत धरतो तर अजीत पवाराची राष्ट्रवादी कॉंग्रेस ला ब्राम्हणाशी काही देणघेण नाही त्यामुळे सरकार ब्राह्मण समाजाचा विचार करण्याच्या मनस्थितीत दिसत नाही. त्यामुळे या अधिवेशन काळात जर परशुराम आर्थिक विकास महामंडळ झाले नाही तर येणाऱ्या निवडणूक मधे ज्या मतदारसंघात ब्राह्मण स्वबळावर निवडून येऊ शकतो तिथे वेगळा विचार करेल , ज्या मतदारसंघात ब्राह्मण मतदान निवडून आणू शकेल किंवा पाडू शकेल अश्या स्थितीत आहे तिथे वेगळा विचार करेल व जिथे कमी आहे तिथे वेगळा विचार करेल याची नोंद सरकारने घेतली पाहिजे जवळजवळ ४५ मतदारसंघ ब्राम्हण बहुल आहेत तर ६० मतदारसंघात गणीत बदलू शकेल अश्या अवस्थेत ब्राह्मण आहे तसेच ब्राह्मण म्हणजे पाय पवित्र अन डोक विचित्र अस संबोधले जाते त्यामुळे सरकारने लवकर विचार करावा व या अधिवेशनात परशुराम आर्थिक विकास महामंडळ १००० कोटी देऊन कार्यान्वित करावे अन्यथा होणाऱ्या परिणामास गृहीत धरणारे असतील याची नोंद आता सगळ्यांनी घ्यावी असे बैठकीत ठरले आहे पुढील रणनितीसाठी निर्णय समिती पुन्हा बैठक घेईल व सरकारला आपले उपद्रवमुल दाखवेल असा विश्वास सर्वानी व्यक्त केला व अधिवेशना नंतर आम्ही तुमच्या कडे येणार नाही आणि तुम्ही पण आमच्या कडे मत मागायला येऊ नका अभियान राबवू असे ठरले आहे.

## शेतपिकाच्या नुकसानीची रक्कम मिळण्यासाठी ई- केवायसी करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

माहे सप्टेबर, ऑक्टोबर २०२२ मध्ये अतिवृष्टी तसेच सततच्या पावसामुळे झालेले शेतपिकांचे नुकसान आणि माहे मार्च, एप्रिल २०२३ मध्ये अवकाळी पावसामुळे व दुष्काळ २०२३ मध्ये झालेले शेतीपिकांचे नुकसानापोटी बीड जिल्ह्यातील ९६४८०४ बाधित शेतकरी लाभार्थ्यांना रुपये ७१७.०९ कोटी अनुदान मंजूर झाले असून सदर अनुदानाचे संगणकीय प्रणाली मार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधी वितरण सुरू आहे.त्यानुसार जिल्ह्यातील ६८२८१२ शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रुपये ५६८.५२ कोटी अनुदानाचे वितरण झाले असून उर्वरित २८१९९२ शेतकरी लाभार्थ्यांपैकी १०११९६ लाभार्थ्यांच्या माहिती सबंधी दुरुस्ती करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी (आधार सेंटरवर जाऊन) करून घेणे व बँक खात्यास आधार मॅपिंग करण्यात यावे.

सद्यस्थितीमध्ये १८०७९६ लाभार्थ्यांपैकी ७२४१० लाभार्थ्यांनी ग्राम स्तरावर प्रसिद्ध झालेल्या विशिष्ट क्रमांक यादी लिस्ट मधील अनुक्रमांकनुसार आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र येथे आधार प्रणानीकरण (ई- केवायसी) करणे आवश्यक आहे. याची तालुका निहाय आकडेवारी खालील प्रमाणे आहे. खालील प्रमाणे शेतकरी यांनी ( नंबर) नुसार आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र येथे आधार प्रमाणीकरण (ई केवायसी) तात्काळ करून घेण्यात यावी.अंबाजोगाई-११६७३,बीड-११०००,आष्टी-७१६६,धारुर-७०१८,माजलगाव-६९२६,केज-६८३३,पाटोदा-५६३४,शिरुर कासार-४७१९,वडवणी-४४८५ गेवराई-४२७७ आणि परळी २६७९ एकूण ७२४१० तसेच अंबाजोगाई, वडवणी व धारुर या तालुक्यात खरीप २०२३ मध्ये दुष्काळ घोषित झाला असून या तालुक्यात ११०८९ शेतकरी लाभार्थ्यांनी आपली माहिती (आधार कार्ड व बँक पासबुकची प्रत) संबंधित गावचे ग्रामसेवक, तलाठी यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी बीड यांनी केले आहे.

## उपक्रमशील शाळा म्हणून जि. प. उर्दू आहेर वाहेगावची निवड



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुका शिक्षक सह पतसंस्थेच्या वतीने तालुक्यात दिल्या जाणारा उपक्रमशील शाळा पुरस्कार यावर्षी तालुक्यात पडळसिंगी केंद्रातील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा आहेर वाहेगाव शाळेची निवड करण्यात आली आहे. याबद्दल सर्वांकडून कौतुक केले जात आहे.

गेवराई तालुका शिक्षक सह पतसंस्थेच्या वतीने शिक्षण क्षेत्रात विविध काम करून शाळेचा सर्वांगिन विकास साधला जावा या हेतूने तालुक्यातील आदर्श शाळा उपक्रम राबविण्यात येते. यामध्ये ग्रामस्थांचा लोकसहभाग, शालेय स्पर्धा, शाळेची बोलकी इमारत, स्वछता, शाळेची गुणवत्ता, गावात शाळेचे योगदान, विविध नाविण्यपूर्ण उपक्रम आदीचे योगदान बघून आहेर वाहेगावची जि. प. उर्दू शाळा तालुक्यात अव्वल ठरली आहे. शाळेचे आदर्श मुख्याध्यापक मिर्झा नुसरत बेग सहकारी शिक्षक जुबेर खान, शेख मोअज्जम, माजेद अहमद, रुबीना हाश्मी, मोहम्मद मुरतूजा, इम्रान खान, मुकरम हाश्मी यांनी उत्तम कामगिरी केली. यासाठी शाळा व्यस्थापन समितीचे अध्यक्ष पठाण मुश्ताक व सर्व पदाधिकार्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. याबद्दल गटशिक्षणाधिकारी नवनाथ सोनवणे, बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी धनंजय शिंदे, केंद्रप्रमुख चंद्रकांत गायकवाड, सरपंच विलास माने, उपसरपंच वाहेद यासीन खान, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पठाण मुश्ताक, उपाध्यक्ष यासह पालक व ग्रामस्थांनी शाळेचे कौतुक केले जात आहे. दिनांक ७ जुलै रविवारी रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज संस्कृतीक सभागृह कन्या शाळे जवळ गेवराई या ठिकाणी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव-सत्कार समारंभ होणार आहे.

## परीक्षा घोटाळ्याची चौकशी करुन गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना न्याय द्या -फरके

माजलगांव । प्रतिनिधी

नीट परीक्षा घोटाळ्याची चौकशी करून गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना न्याय द्या अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज फरके यांनी शासनाकडे केली आहे.

नीट परीक्षेचा निकाल ४ जून रोजी घोषित झाला. यात काही धक्कादायक बाबी उघडकीस आल्या .६७ विद्यार्थांना ७२० पैकी ७२० मार्क्स पडले आहेत. प्रतिवर्षी सिंगल फिगर मध्ये ही संख्या असते. हरियाणा मध्ये एकाच केंद्रात ७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० मार्क कसे मिळू शकतात ? उत्तर वगळले तर ४ गुण कमी होतात व चुकीचं उत्तर दिल्यास ५ गुण कमी होतात. असे असेल तर ७१७, ७१८ किंवा ७१९ एवढे मार्क्स पडणे शक्य आहे काय ? या गोंधळामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या! त्याची जबाबदारी कोणावर ? विद्यार्थ्यांच्या मनाशी,त्यांच्या भवितव्याशी अजून किती खेळायचंय? या विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय दूर करावा अशी मागणी आज विद्यार्थी, पालक व शिक्षकांसमवेत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज फरके यांनी माजलगांव तहसीलदार यांना निवेदनातून केली. यावेळी प्रा प्रशांत तौर , प्रा फपाळ, प्रा कुलकर्णी, प्रा दिगंबर मांडवगणे,प्रा भगवान गायकवाड, तालुका उपाध्यक्ष मुंजाभाऊ घायतीडक, दत्ता गायके, यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते. या दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे. अन्यथा या विद्यार्थ्यांवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी इतिहासात झाले नाही, असे आंदोलन करण्याची आमची तयारी आहे. या विद्यार्थ्यांना कोणीही नाही, असे समजू नका. सरकारकडून या आत्महत्यांचा हिशोब घेऊ असे मनोज फरके यांनी सांगितले आहे.

## जैन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




बीड । प्रतिनिधी

जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळ आणि वर्धमान स्थानकवासी श्वेतांबर जैन श्रावक संघ बीडच्या संयुक्त विद्यमानाने इयत्ता दहावी-बारावीसह व्यवसायीक अभ्यासक्रमांमध्ये घवघवीत यश संपादन करणार्या जैन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा येथील जैन भवनमध्ये बुधवारी (दि.२६) समाजातील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी समाजभुषण नितीनचंद्रजी कोटेचा म्हणाले की, सध्याचा काळ हा स्पर्धेचा असून मुलांनी विद्यार्थी दशेपासून शिक्षकांनी दिलेल्या शिकवणीवर लक्षकेंद्रीत केले पाहिजे. कारण जो शिकेल तोच टिकेल हीच आजची परस्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अवांत्तर बाबींकडे लक्ष न देता आपले उज्वल भविष्य घडविण्यासाठी एकाग्रतेने अभ्यासावर भर दिल्यास यशाचे शिखर गाठता येणे शक्य आहे असा मोलाचा सल्ला ही श्री. कोटेचा यांनी विद्यार्थ्यांना दिला.

जैन समजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी दरवर्षी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करुन योग्यदिशा देण्यासाठी जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने मार्गदर्शन केले जाते. यंदाही इयत्ता दहावी आणि बारावी परिक्षेमध्ये यश संपादन करणार्या तसेच नीट परिक्षेद्वारे वैद्यकीय अभ्यासक्रमासह इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमासाठी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांची निवड झालेल्या त्या गुणवंत विद्यार्थ्यांचा जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळ आणि वर्धमान स्थानकवासी श्वेतांबर जैन श्रावक संघ बीडच्या संयुक्त विद्यमानाने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजभूषण नितीनचंद्रजी कोटेचा होते. यावेळी जैन समाजातील जेष्ठ भगवानदासजी लोढा, विजयराजजी खिवंसरा, प्रकाशचंदजी कोटेचा, शरदजी लोढा, मनोजजी छाजेड याची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सीए आदेशजी नहार, जितेंद्रजी बोरा, डॉ. धिरजजी नहार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच पृथ्वीराज आब्बड यांनी मन की बात मधुन सामाजिक सद्य परस्थिती बाबत समाजासमोर आपले विचार मांडले तर गुणवंत विद्यार्थ्यांना रामलालजी छाजेड, अभयचंदजी कोटेचा यांनी शुभेच्छा दिल्या व समाजातील अन्य विद्यार्थ्यांनी देखील विविध क्षेत्रामध्ये स्वत:सह समाजाचे नाव लौकीक करण्याची जवाबदारी आजच्या विद्यार्थ्यांवर असल्याचेही उपरोकत मान्यवरांनी म्हटले. प्रस्ताविक सुशिल आब्बड यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल कोटेचा, सौ. सारिकाजी नहार यांनी केले. आभार राहुलजी बोरा यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पारस बोरा, सुशिल सुराणा, सुनिल दोडिया, सुशिल आब्बड, राहुल बोरा,जितेंद्र लोढा, पृथ्वीराज आब्बड, रामलाल छाजेड सर, मनोज कोटेचा आदींनी परिश्रम घेतले. साधारणत: चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वर्धमान स्थानकवासी श्वेतांबर जैन श्रावक संघ बीडच्या कार्यकारणीच्या निवडीसाठी धर्मादाय आयुक्तांनी दिलेला निर्णय आणि अधिकारानुसार ट्रस्टी अ‍ॅड. रतीलालजी भंडारी व भगवानदासजी लोढा यांनी नवीन कार्यकारणीची निवड केली. कार्यकारणीच्या अध्यक्षपदी सुभाषचंद चंदुलालजी दौडिया, उपाध्यक्षपदी रामलाल खुशालचंदजी छाजेड, सचिवपदी मनोज कांतीलालजी कोटेचा, सहसचिव स्वप्निल अभयचंदजी कोटेचा, कोषाध्यक्षपदी मनोज कमलचंदजी सोनी तसेच विश्वस्त म्हणून अ‍ॅड. रतीलाल भंडारी, पारस बोरा, पारसमल बागमार, सुभाष कोटेचा, दिलीप खिवंसरा, दीपककुमार सुराणा, आनंद मुगदिया, वर्धमान खिवंसरा, राजीव बागमार, पंकज बोरा यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी नुतन कार्यकारणीच्या पदाधिकार्यांचा देखील जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळ आणि समजातील मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# नुकसान भरपाईपोटी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात ५६८ कोटी जमा

## शेतपिकाच्या नुकसानीची रक्कम मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ई- केवायसी करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

माहे सप्टेबर, ऑक्टोबर २०२२ मध्ये अतिवृष्टी तसेच सततच्या पावसामुळे झालेले शेतपिकांचे नुकसान आणि माहे मार्च, एप्रिल २०२३ मध्ये अवकाळी पावसामुळे व दुष्काळ २०२३ मध्ये झालेले शेतीपिकांचे नुकसानापोटी बीड जिल्ह्यातील ९६४८०४ बाधित शेतकरी लाभार्थ्यांना रुपये ७१७.०९ कोटी अनुदान मंजूर झाले असून सदर अनुदानाचे संगणकीय प्रणाली

मार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधी वितरण सुरू आहे.

त्यानुसार जिल्ह्यातील ६८२८१२ शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रुपये ५६८.५२ कोटी अनुदानाचे वितरण झाले असून उर्वरित २८१९९२ शेतकरी लाभार्थ्यांपैकी १०११९६ लाभार्थ्यांच्या माहिती सबंधी दुरुस्ती करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी (आधार सेंटरवर जाऊन) करून घेणे व बँक खात्यास आधार मॅपिंग करण्यात यावे.

सद्यस्थितीमध्ये १८०७९६ लाभार्थ्यांपैकी ७२४१० लाभार्थ्यांनी ग्राम स्तरावर प्रसिद्ध झालेल्या विशिष्ट क्रमांक यादी लिस्ट मधील अनुक्रमांकनुसार आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र येथे आधार प्रणानीकरण (ई- केवायसी) करणे आवश्यक आहे. याची तालुका निहाय आकडेवारी खालील प्रमाणे आहे. खालील प्रमाणे शेतकरी यांनी ( नंबर) नुसार आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र येथे आधार प्रमाणीकरण (ई केवायसी) तात्काळ करून घेण्यात यावी. अंबाजोगाई-११६७३,बीड-११०००,आष्टी-७१६६,धारुर-७०१८,माजलगाव-६९२६,केज-६८३३,पाटोदा- ५६३४,शिरुर कासार-४७१९,वडवणी-४४८५ गेवराई-४२७७ आणि परळी २६७९ एकूण ७२४१० तसेच अंबाजोगाई, वडवणी व धारुर या तालुक्यात खरीप २०२३ मध्ये दुष्काळ घोषित झाला असून या तालुक्यात ११०८९ शेतकरी लाभार्थ्यांनी आपली माहिती (आधार कार्ड व बॅक पासबुकची प्रत) संबंधित गावचे ग्रामसेवक, तलाठी यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी बीड यांनी केले आहे.

### निवडणुकीच्या लेख्यांची पोहोच पावती निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी घ्यावी

**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाने निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांची तपासणीची कार्यपध्दती विशद केलेली आहे त्यानुसार उमेदवाराने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांसमोर निवडणूक खचर्चाचे लेखे समावेश असलेली नोंदवही, रोख नोंदवही, दैनंदिन खाते नोंदवही, संक्षिप्त विवरणपत्र (भाग १ ते ४ आणि अनुसूचित १ ते ११) सर्व देयके व प्रमाणके (अनुक्रमांक दिलेले) आणि मुळ प्रतीतील शपथपत्र, केवळ खर्चाच्या प्रयोजनासाठी उघडण्यात आलेले बँकेच्या विवरणपत्राची सर्व बाबतीत यथोचीतरित्या भरलेली आणि स्वंय साक्षांकित प्रत्? निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सादर करणे बंधनकारक असते.

## ज्ञानराधाच्या संचालक मंडळाविरोधात परळीत गुन्हा

**परळी । प्रतिनिधी**

राजस्थानी मल्टिस्टेटच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल झाल्यानंतर आता ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालक मंडळावर लाखो रुपयांची फसवणूक केल्याबद्दल शहरातील संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार ठेवीदारांनी ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटी मध्ये आपल्या मेहनतीने कमावलेला पैसा मुदत ठेवी करण्यासाठी ठेवला होता.सन २०१६ ते आजमितीला ठेवीदारांनी तब्बल ७८ लाख ६५ हजार ७२० रु च्या ठेवी ठेवल्या मात्र मुदतीनंतर देखील ठेवलेल्या ठेवी परत मिळत नसल्याने

बँक ऑफ महाराष्ट्रचे सेवानिवृत्त कर्मचारी नरहारी मारूतीअप्पा टेकाळे (वय ६९ वर्षे) यांनी संभाजी नगर पोलीस ठाण्यात ज्ञानराधा मल्टिस्टेटचे चेयरमन सुरेश कुटे, गोविंद साखरे व इतर संचालक मंडळी व कर्मचारी यांच्या विरोधात गुरनं १०६/२०२४ कलम ४२०,४०६,३४ भादवी सह कलम महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण अधि १९९९ चे कलम ३,४ नुसार गुन्हा दाखल केला असून याप्रकरणी अधिक तपास ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

## बीडच्या पाच खेळाडूंनी गाजवली राष्ट्रीय रग्बी स्पर्धा ; महाराष्ट्र संघास मिळाले ब्राँझ पदक

**बीड । प्रतिनिधी**




श्री शिवछत्रपती क्रीडापीठ महाळुंगे - बालेवाडी पुणे येथे १८ वर्षाखालील राष्ट्रीय रग्बी स्पर्धाचे दि.२५ व २६ जून या कालावधीत रग्बी असोसिएशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र रग्बी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले.या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघाची निवड दिनांक २४ जून रोजी रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांनी श्री नासेर हुसेन,श्री मीनल पास्तला,श्री ईश्वर कोतरिकी यांच्या मार्गदृशनाखाली करण्यात आली.यामध्ये बीड जिल्हा रग्बी असोसिएशनच्या पाच खेळाडूंची निवड करण्यात आली. ✻जिल्हा रग्बी असोसिएशनच्या इतिहासात पहिल्याच वेळी तब्बल ५ खेळाडू (एकूण संघ १२खेळाडू) एवढ्या मोठ्या संख्येने राज्य संघात स्थान पटकावले.✻१९ वर्षाखालील राज्यस्तरीय स्पर्धेत बीड जिल्हा संघाने रौप्य पदक प्राप्त केलेले होते. राज्य स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात, बीडच्या ६ खेळाडूंची निवड झाली. यात यश बालासाहेब जाधव(अंतरराष्ट्रीय खेळाडू) , सुरज बालासाहेब येवले, सुरज राजेभाऊ येडे, ओंकार मनोजकुमार मोरे,संदीप राजेश वडमारे या खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली. निवड झालेले सर्व खेळाडू मोरया क्रीडा मंडळ,कॅनॉल रोड, हॉटेल तुळजाई शेजारी बीड, येथे मुख्य प्रशिक्षक तथा मोरया क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री नितीन येळवे सर, महाराष्ट्र कारागृह पोलीस श्री शोएब खाटीक सर, क्रीडाशिक्षक श्री अशोक चौरे सर, यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात.

राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी महाराष्ट्र संघाने प्रथम सामना चंदिगड ०० गुण विरुद्ध महाराष्ट्र ६२ गुण , ◀◀ पान ३ वर

## पूर्णा-परळी-पूर्णा सवारी गाडी काही दिवस रद्द

**परळी । प्रतिनिधी**

दक्षिण मध्ये रेल्वेच्या मार्गावर देखभाल व दुरुस्ती कामानिमित्ताने पूर्णा-परळी-पूर्णा ही सवारी गाडी काही दिवस रद्द करण्यात आली असल्याचे रेल्वे विभागाने कळविले आहे.




दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड कार्यालयाने जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रक क्रमांक २३९ नुसार दक्षिण मध्य रेल्वेच्या मार्गावरील देखभाल व दुरुस्ती कामानिमित्त गाडी क्रमांक ०७५९९ पूर्णा-परळी सवारी गाडी दिनांक २८ जून ते ०८ जुलै २०२४ दरम्यान रद्द करण्यात आली आहे तर गाडी क्रमांक ०७५९८ परळी पूर्णा सवारी गाडी दिनांक २८ जून ते ०८ जुलै २०२४ दरम्यान रद्द करण्यात आली आहे. दोन्ही मार्गावर सदरील सवारी गाडी ही ११ दिवस धावणार नसल्याची प्रवाशांनी दखल घ्यावी.

## तीन जुलै रोजी होणार रमेश चेन्नीथला व नाना पटोले यांचा सत्कार सोहळा -सुरेश यादव





**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला महाराष्ट्र प्रभारी मा.रमेश चेन्नीथलाजी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष मा.नानाभाऊ पटोले साहेब यांच्या अथक परिश्रमामुळे काँग्रेस पक्षाला राज्यामध्ये घववीत यश प्राप्त झाले. त्या अनुषंगाने काँग्रेस सेल विभागाच्या माध्यमातून राज्यस्तरीय सत्कार सोहळा कार्यक्रम होत आहे. निवडणूक वेळी नानाभाऊ पटोले यांच्या सूचना निर्देशानुसार राज्यामध्ये सेल विभागाच्या मुख्य संयोजिका प्रज्ञा वाघमारे यांनी सर्व विभागाच्या टीमचे प्रचारकार्य नियोजन केले होते.

सेल विभागाच्या प्रदेश प्रमुख टीमने वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये जाऊन काँग्रेस पक्ष प्रचार प्रसार कॅम्पिंग कार्य केले होते.काँग्रेस सेल विभागाच्या माध्यमातून राज्यस्तरीय राज्य पक्ष नेतृत्वाचा सन्मान व पदाधिकारी कार्यकर्ते मेळावा तसेच सेल विभाग ◀◀ पान ३ वर

## संत शेख महंमद महाराज पालखी सोहळ्याचे ८ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान

**आष्टी । प्रतिनिधी**




संत शिरोमणी शेख महंमद महाराजांचे जन्मगाव श्रीक्षेत्र वाहिरा ते श्रीक्षेत्र पंढरपूर पालखी सोहळ्याचे सोमवार दि. ८ जुलै रोजी प्रस्थान होणार आहे. याप्रसंगी आमदार सुरेश धस, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आ. साहेबराव दरेकर, माजी आ. भीमराव धोंडे साहेब, मा. बापूसाहेब डोके, आदींसह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी ८ वा. महाआरती होणार आहे. त्यानंतर श्वेत ध्वजाचे पुजन करुन पालखी सोहळा मार्गस्थ होईल, अशी माहिती पालखी सोहळ्याचे समन्वयक ह.भ.प. सोमनाथ महाराज मेटे यांनी दिली.

पालखी सोहळ्यामध्ये वाहिरा, बोडखा, घोंगडेवाडी, खुंटफळ, कुंबेफळ, पुंडी, मेहकरी, पिंपळगाव, बेलगांव, अहमदनगरसह विविध गावातील वारकरी सहभागी होतात. सुमारे ३५० वर्षांपूर्वी संत शिरोमणी शेख महंमद महाराजांनी श्वेत ध्वजाची दिंडी पंढरपूरमध्ये नेण्याची परंपरा सुरु केली होती. मात्र दरम्यानच्या काळात ही परंपरा खंडीत झाली. श्री संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानच्या माध्यमातून गतवर्षापासून हा पालखी सोहळा नव्या जोमाने पूर्ववत सुरु केली आहे. वारी मार्गावर गावोगावी पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात येते. वारकऱ्यांना सकाळ, संध्याकाळ जेवण व नाष्ट्याची व्यवस्था अन्नदात्यांच्या वतीने केली जात आहे.वारी मार्गावर भजन, किर्तन, भारुड ◀◀ पान ३ वर

## भांडणाची कुरापत काढून जीवघेणा हल्ला

**परळी । प्रतिनिधी**

जुन्या भांडनाची कुरापत काढून धारदार शस्त्राने जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्या प्रकरणी शहरातील संभाजी नगर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मजुरी व्यवसाय करणारा संदेश बाळकृष्ण रोडे ( वय २५) हे त्याचा भाऊ व आईसह परळी येथील मिलिंद नगर भागात राहत असलेल्या मामाच्या भेटीला जात असताना मिलिंद नगर पाटी जवळ जुन्या भांडणाच्या कारणावरून तिघाजणांनी रोडे यांच्यावर तलवार, चाकु व लोखंडी रॉडने डोक्यात, पायावर मारून गंभीर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी संदेश रोडे यांच्या फिर्यादीवरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुरनं. १०७/२०२४ कलम ३०७,३२६,३२४,३४१,३२३,५०४,५०६,३४ भादवी सह कलम ४/२५ शस्त्र कायद्यानुसार तिघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे हे करत आहेत.

## सकाळी शाळा, दुपारी व्यवसायात मदत करतच अभ्यास ; परळीच्या शाळकरी मुलाचे सर्वत्र कौतुक

**परळी । प्रतिनिधी**



परिस्थिती हीच मानवाला सर्वात मोठं शिक्षण देत असते याची प्रचिती पुनः एकदा अनुभवयास आली.घरची बिकट परिस्थिती मात्र शिक्षण सोडायच नाही हाच ध्यास उराशी बाळगून शाळा संपल्यावर आपल्या वडिलांच्या व्यवसायात वडिलांना मदत करत शाळेचा अभ्यास पूर्ण करत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलागा शहरात चर्चेचा विषय बनला आहे.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो प्राशन करतो तो गुरगुरल्या शिवाय राहत नाही ही जिद्द उराशी बाळगून प्रतिकूल परिस्थितीत देखील येणाऱ्या संकटावर मात करत आपले शिक्षण पूर्ण करणारा दीपक उर्फ रोहन मुंडे हा मुलगा शहरात चर्चेत आला आहे. दीपक मुंडे याचा वडिल शहरातील प्रभू वैद्यनाथ मंदिर पायऱ्यांच्या जवळ रस्त्यावर बेल-फुल विक्रीचा व्यवसाय करतात. दीपक हा इयत्ता ६ मध्ये शिक्षण घेत असून दररोज तो शाळा सुटल्यावर ◀◀ पान ३ वर

## आष्टी तालुक्यात तहासिलच्या पोलीस प्रशासनाच्या अर्थपुर्ण दुर्लक्षामुळे वाळु तस्करी फोफावली

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात गेल्या सहामहीन्यापासुन आवैध धंदे त्याच बरोबर चोरटी वाळु तस्करी एवढ्या मोठ्या प्रमाणात होत आसुन तालुक्यात सोभावतलचे नदीपात्रीत गावाच्या जनिनीची आक्षरःशा चाळनी झाली आहे .दीवसा ढवळ्या तालुक्यात दर दीवसाला लाखो ब्रास वाळु जीसीबी मशीनच्या साह्याने उकरली जात आहे हे सर्व आष्टी तहसिलच्या महसुल प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या आर्थपुर्ण दुर्लक्षा मुळे सहज रीत्या ही वाळु तस्करी दीवसा ढवळ्या शहरात टीप्पर,ट्रॅक्टरच्या साह्याने शासनाचा लोखोचा महसुल बोडऊन हे लोक वाळु विक्री करत आहेत .हे वाळु तस्कर वाळु तस्करी बरोबर ईतर आवैध धंद्याशी देखील जोडले गेले आहेत . प्रकरनातुन जनतेच्या समोर आले जिल्हा आधिकारी व स्थानिकच्या आमदार महोदयानी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे नाहीतर एकदीवस आसा ऐईल या गावात चिमनीला देखील पाणी प्यायला राहचे नाही.. मटका हातभट्टी,तसेच गोवंश हत्या कायद्यालाही तिलांजली आहे.

## अल्पवयीन मुलगी बेपत्ता वडिलांची पोलिसांकडे धाव

**परळी । प्रतिनिधी**

बांधकामावर कामगार म्हणून काम करणाऱ्या परळीतील एका कुटुंबातील पित्याने आपली अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली असुन तिला कोणीतरी पळवून नेले असल्याचा संशय व्यक्त करत पोलीसांत धाव घेतली आहे. गेल्या काही दिवसात परळी शहरात अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

परळी शहरानजीकच्या समता नगर भागात मिस्त्री व बांधकाम कामगार म्हणून काम करणारे एक कुटुंब राहते. या कुटुंबातील १३ वर्षिय मुलगी दि.२४ रोजी दुपारी ०३ वा चे सुमारास घरी असताना बाथरुमला जावुन येते असे तिच्या आईला म्हणुन गेली ती परतलीच नाही. तिच्या कुटुंबियांनी शेजारी, नातेवाईक सगळीकडे शोध घेतला मात्र तिचा पत्ता लागला नाही. त्यामुळे बेपत्ता ◀◀ पान ३ वर

## प्रा. डॉ. गजानन सवने यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**




येथील वसुंधरा महाविद्यालयातील हिंदी विभागात कार्यरत असलेले प्रा. डॉ. गजानन सवने यांना नाशिक येथील क्रीडा व संस्कृती फाउंडेशन द्वारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार पद्मश्री व अर्जुन पुरस्कार विजेते ब्रह्मानंद कामत शंकरवाल यांच्या हस्ते नाशिक येथे प्रदान करण्यात आला.

प्रा. डॉ.गजानन सवने हे हिंदी विषयाचे प्राध्यापक असून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकच्या अभ्यास केंद्राची समन्वयक आहेत. त्यांची दोन पुस्तके व अनेक पत्रिका मध्ये संशोधन परक लेख प्रकाशित झाले आहेत तसेच महाविद्यालयातील होणाऱ्या खेळाच्या स्पर्धेत ते सहभागी असून विद्यार्थ्यांना खेळासाठी प्रोत्साहित ◀◀ पान ३ वर

## अंबाजोगाईचे बसस्थानक मराठवाड्यात 'स्वच्छ सुंदर'

### सलग दुसऱ्या वर्षी प्रथम, १० लाखांचे बक्षीस

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



बीड : राज्यातील सगळे बसस्थानक स्वच्छ व सुंदर असावेत, यासाठी राज्य शासनाकडून 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे' स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान सुरू केले आहे. या अभियानाअंतर्गत सलग दुसऱ्यावेळी अंबाजोगाई बसस्थानक छत्रपती संभाजीनगर प्रदेशात प्रथम आले आहे. यामुळे या बसस्थानकाला १० लक्ष रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे.

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे' स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानासाठी राज्य परिवहन महामंडळामध्ये मध्यवर्ती व विभागीय स्तरावर दोन समित्या स्थापन केल्या आहेत. या अभियानातून स्वच्छता आराखडा तयार केला जातो. तसेच यासाठी १०० गुणांपर्यंत मूल्यांकन करुन गुण दिले जातात. यामध्ये ७६ गुण मिळवत ◀◀ पान ३ वर

## फार्मसी महाविद्यालयात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचा जयंती उत्सव साजरा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्?यालय अंबाजोगाई येथे दि २६ बुधवार रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५० वी जयंती उत्सहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी शाहू महाराजांच्या प्रतीमेस पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून पुजन केले. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे रिंग रोड संपादनासाठी हुडकोकडून ५ हजार ५०० कोटींचे कर्ज घेण्यास मान्यता

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे रिंग रोड पूर्व प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ५ हजार ५०० कोटी हुडकोकडून कर्जरुपाने घेण्यास बुधवारी (दि. २६) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मागणी केल्यानुसार या कर्जासाठी शासन हमी देण्यात येणार आहे. एकूण ९७२.०७ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावयाचे असून एकूण ५३५.४२ हेक्टर जमिनीचे भूसंपादन झाले आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी १ हजार ८७६ कोटी २९ लाख रुपये निधी देण्यात आला आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातून होणारी वाहतूक कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पुणे रिंगरोड हा प्रकल्प हाती घेतला आहे. एमएसआरडीसीने पूर्व आणि पश्चिम अशा दोन टप्प्यांमध्ये पुणे रिंगरोडचे काम हाती घेतले आहे. या रिंगरोडची लांबी १२७ किलोमीटर आहे. तर रुंदी ११० मीटर आहे. दोन टप्प्यांमध्ये या रस्त्याचे काम होणार आहे. पश्चिम भागातील रिंगरोडसाठीचे सुमारे ८० टक्के भूसंपादन झाले आहे. पश्चिम भागातील रस्त्यासाठी पाच पॅकेज (टप्पे) करण्यात आले आहेत. पूर्व भागासाठी सुमारे ७० टक्क्यांहून अधिक भूसंपादन झाले आहे. पूर्व भागातील रस्त्यासाठी चार पॅकेज (टप्पे) करण्यात आले आहेत. या रस्त्याचे काम देण्यासाठी एमएसआरडीसीने निविदा प्रक्रिया राबवली. निविदा भरण्याची अंतिम मुदत १६ एप्रिल पर्यंत होती. त्यानंतर या निविदा नुकत्याच उघडण्यात आल्या

# पाच हजारांची लाच घेताना पोलीस शिपाई एसीबीच्या जाळ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

उत्खननातील माती वाहून नेणाऱ्या वाहनांवर कारवाई न करण्यासाठी पाच हजारांची लाच घेतल्याप्रकरणी बावधन वाहतूक विभागातील पोलीस अंमलदाराला रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई गुरुवारी (दि. २७) बावधन वाहतूक पोलीस चौकीसमोर करण्यात आली.

समाधान वालचंद लोखंडे (वय ३१, नेमणूक - बावधन वाहतूक विभाग) असे रंगेहात पकडलेल्या पोलीस अंमलदाराचे नाव आहे. याप्रकरणी ३२ वर्षीय व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) तक्रार केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांचा उत्खनन केलेली माती व इतर मटेरियल ने आण करण्यासाठी माल वाहतूक गाड्यांचा व्यवसाय आहे. उत्खननातील माती वाहतूक करताना कोणत्याही गाडीवर कारवाई न करण्यासाठी प्रत्येक गाडीला एक हजार रुपये याप्रमाणे पाच गाड्यांचे पाच हजार रुपये देण्याची पोलीस अंमलदर समाधान लोखंडे यांनी मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी एसीबीकडे तक्रार केली. एसीबीने सापळा लावून पाच हजारांची लाच घेताना समाधान लोखंडे यांना रंगेहात पकडले. याप्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. एसीबीचे पोलीस निरीक्षक वीरनाथ माने तपास करीत आहेत.

# मिठाई विक्रेत्याकडे मागितली दोन कोटींची खंडणी

**पुणे । प्रतिनिधी**

मिठाई विक्रेत्याला फोन करून अज्ञात व्यक्तीने दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली आहे. खंडणी न दिल्यास कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. खंडणीसाठी आलेले फोन हे कॉल सेंटरच्या इंटरकॉमवरून आल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी मांगीलाल घिसाराम चौधरी (वय ४४, रा. दळवीनगर, मुंढवा) यांनी मुंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार चौधरी यांचे मिठाईचे दुकान आहे. त्यांना आणि त्यांच्या मुलाच्या मोबाइलवर अज्ञात व्यक्ती मागील दहा ते १५ दिवसांपासून वारंवार कॉल करून धमकी देत आहेत. 'तुम्हारे दो बेटे है, उनका नाम सुरेंद्र और महेंद्र हे. दो खोके खंडणी देना पडेगा, नही तो तुम्हारा छोटा लडका क्रिकेट खेलने जाता हे, उसे उठाऊंगा, तुम्हारे फॅमिली को खतम करूंगा' अशी धमकी दिली. फिर्यादीने सुरुवातीला त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र, धमकीचे फोन वारंवार येऊ लागले. 'तू पैसा नहीं देगा तो देख हम क्या करते है, तू पछतायेगा' अशा धमक्या येऊ लागल्या. सहाय्यक पोलिस निरीक्षक समीर करपे तपास करत आहेत.

# पुण्यात महापालिकेने पकडले तब्बल ३०० किलो प्लास्टिक

**पुणे । प्रतिनिधी**

प्लास्टिकच्या पिशव्यांवर बंदी असतानाही होलसेल मार्केटमध्ये खुलेआम प्लास्टिक विक्री व पुरवठा केला जात आहे. महापालिकेने स्थापन केलेल्या केंद्रीय प्लास्टिक विरोधी पथकाने आज (ता. २७) शहरात बंदी असलेल्या ३०० किलोच्या प्लास्टिकच्या पिशव्या वाहतूक करताना पकडल्या. तसेच १० हजार रुपयांचा दंड वसूल केला. ही कारवाई दुपारी दीडच्या सुमारास बालगंधर्व रंगमंदिरासमोर करण्यात आली.



पालखी सोहळ्यासाठी लाखो वारकरी पुण्यात येतात. या काळात प्लास्टिकचा वापर वाढू नये, यासाठी महापालिकेकडून प्रतिबंधात्मक कारवाई सुरु करण्यात आली आहे. यासाठी महापालिकेने केंद्रीय प्लास्टिक विरोधी पथक स्थापन केले आहे. आज दुपारी हे पथक जंगली महाराज रस्त्यावरून एका टेम्पोतून मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या पिशव्यांनी वाहतूक करत असलेल्या टेम्पोला महापालिकेच्या पथकाने पकडले.

टेम्पो चालकाने माहिती देताना उडवी-उडवीची उत्तरे दिली. महापालिकेने कायद्यानुसार त्याला १० हजार रुपये दंडाची शिक्षा करून टेम्पोतील ३०० किलो प्लास्टिकच्या पिशव्या जप्त केल्या. प्रमुख आरोग्य निरीक्षक आय.एस. इनामदार, आरोग्य निरीक्षक शाहू पोकळे, उमेश देवकर, राजेश रासकर, अमोल पवार, जालिंदर चांदगुडे यांनी ही करावाई केली.

# 'पालखी'साठी असणार पाच हजार पोलिस तैनात

**पुणे । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू श्री तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा रविवारी (दि. ३०) शहरात दाखल होणार आहे. पालखी सोहळ्यासाठी वारकरी तसेच भाविकांची मोठी गर्दी होणार असून, शहरात सुमारे पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. तसेच ठिकठिकाणी सीसीटीव्ही, वॉच टॉवरची नजर असून, गर्दीच्या ठिकाणी गुन्हे शाखेची खास पथके गस्त घालणार आहेत. महिला सुरक्षेसाठी दामिनी मार्शल तैनात असणार आहे. चोरट्यांच्या बंदोबस्तासाठी साध्या वेशात पोलिसांची पथके असणार आहेत.

श्रीक्षेत्र देहूमधून जगद्गुरू श्रीतुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे शुक्रवारी (दि. २८ जून), तर संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे शनिवारी (दि.२९ जून) आगमन होणार आहे.

रविवारी (दि.३०) दोन्ही पालख्या पुण्यात दाखल होणार आहे. पालखी सोहळा रविवारी आणि सोमवारी शहरात मुक्कामी असणार असून, मंगळवारी (दि. २५) पालखी सोहळा पुढे मार्गस्थ होणार आहे. नाना पेठेतील श्रीनिवडुंग्या विठोबा मंदिर येथे श्रीतुकाराम महाराज यांची पालखी मुक्कामी असणार आहे. भवानी पेठेतील श्रीपालखी विठोबा मंदिरात श्रीज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा असणार आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताची आणखी करण्यात आली असून, सुमारे पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त शहरात तैनात राहणार आहे.

# अजितदादांना महायुतीतून बाहेर काढा भाजप कार्यकर्त्यांची आमदारासमोरच मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना महायुतीतून बाहेर काढावे, अशी मागणी भाजपचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष आणि पुणे बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी यांनी शिरूर लोकसभा आढावा बैठकीमध्ये केली. पवार सत्तेत असतील तर आम्हाला सत्ता नको. पुण्याचे पालकमंत्री म्हणून अजित पवार आमच्या बोकांडी बसवले आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.



भाजप आमदार राहुल कुल यांच्यासमोर आढावा बैठकीत बोलताना चौधरी म्हणाले, अजित पवारांना या महायुतीतून बाहेर काढा, असे प्रत्येक कार्यकर्त्यांचे मत आहे. याला तुम्ही सल्ला समजलात तरी चालेल. अजित पवारांनी सुभाष बापू, राहुल दादांवर, योगेश अण्णांवर अन्याय केला आहे. हे तिघेही मंत्री झाले असते. अनेक लोकांना महामंडळ मिळाले असते. अजितदादांकडे आमचे आबासाहेब सोनावणे आणि श्याम गावडे निधी मागायला गेले तर अजितदादा म्हणाले तुमचा काय संबंध आम्ही १० टक्केच निधी देणार अरे नको आम्हाला अशी सत्ता..

अजित पवारांनी भाजप कार्यकर्त्यांवर अन्याय केला आहे. अजित पवार सत्तेत असतील तर आम्हाला सत्ता नको. पुणे आणि सोलापूर जिल्ह्याची अशीच परिस्थिती आहे. सोलापूरला कायम बाहेरच्या जिल्ह्याचा पालकमंत्री मिळाला आहे. स्वाभिमानी नेतृत्त्व पुणे जिल्ह्याला मिळत नाही. पुणे जिल्ह्यातील लोकांचे हाल झाले आहे. ज्या राष्ट्रवादीचा गेली १० वर्षे आम्ही विरोध करतोय तीच राष्ट्रवादी तुम्ही आमच्या बोकांडी आणून ठेवली आहे. अक्षरश: कार्यकर्ते भीतीच्या वातावरणात आहे. अजित पवारांना कशासाठी सत्तेत घेतले आहे? असा सवाल देखील त्यांनी केला आहे. अजित पवारांनी पालकमंत्री व्हायचे, तिथे त्यांनी बॉस व्हायचे आणि आदेश द्यायचे आणि भाजपच्या कार्यकर्त्यांना चिरडण्याचे काम करायचे.. नको आम्हाला अशी सत्ता अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

# पोलिसाची पत्नीला बेदम मारहाण

**दौंड । प्रतिनिधी**

किरकोळ कौटुंबिक वादातून पत्नीला पट्ट्याने बेदम मारहाण केल्याप्रकरणी दौंड शहरात पोलिस नाईक पदावर कार्यरत असणाऱ्या सोमनाथ शिंदे याच्याविरूध्द मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दौंड पोलिस ठाण्याचे अंमलदार बापू रोटे यांनी याबाबत माहिती दिली. शहरातील राज्य राखीव पोलिस दल गट क्रमांक सातमध्ये सशस्त्र पोलिस नाईक या पदावर कार्यरत असणारे सोमनाथ गंगाराम शिंदे (वय ३३, रा. ५६५ क्वॉर्टर्स, एसआरपीएफ वसाहत, दौंड) यांचे त्यांच्या पत्नीशी २५ जून रोजी सकाळी वाद झाला होता.

पत्नी प्रियांका शिंदे यांनी घरासाठी किराणा सामान आणले असता, सोमनाथ शिंदे यांनी मला न विचारता किराणा सामान का भरले? असा प्रश्न करीत शिवीगाळ करून हाताने व बेल्टने डोक्यावर मारहाण केली. त्यावर प्रियांका शिंदे यांनी तुमचे घरात लक्ष नसते म्हणून मी किराणा भरले, तुम्ही घरात लक्ष देत जावा असे सांगताच सोमनाथ यांनी रागाच्या भरात त्यांच्या कमरेच्या चामडी पट्ट्याने प्रियांका यांना पाठीत व मांडीवर बेदम मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दौंड पोलिसांनी प्रियांका शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सोमनाथ शिंदे याच्याविरूध्द भारतीय दंड विधान कलम ३२३ (इच्छापूर्वक दुखापत करणे), ३२४ (घातक साधनांनी दुखापत करणे), ५०४ ( शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे) व ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# सशस्त्र सेनेतील जवानांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने विभागीय आयुक्त कार्यालयात सशस्त्र सेनेतील जवान आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ९० रक्ताच्या पिशव्या संकलित करण्यात आल्या.





विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी उपायुक्त वर्षा लड्डा-उंटवाल, निलीमा धायगुडे, पूनम मेहता, वैशाली इंदानी, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ भंडारे, सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाचे मेजर अनुराग, गट विकास अधिकारी भूषण जोशी, सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्त पेढीचे समन्वयक प्रणाल ढेकणे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी रक्तदान केले. यावेळी मेजर अनुराग यांनी आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांना प्रमाणपत्र दिले तर आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांच्या हस्ते रक्तदान केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांच्या हस्ते वृक्षारोपण विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बायोस्फिअर्सचे डॉ. सचिन पुणेकर आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना सुवर्ण पिंपळ वृक्ष बीजाचे वाटप करण्यात आले. श्री. पुणेकर यांनी अजान वृक्षाची माहिती दिली.

# छत्रपतींच्या सन्मानासाठी पुण्यात शुक्रवारी 'रास्ता रोको' आंदोलन



**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह अन्य महापुरुष व राष्ट्रीय प्रतीके यांच्या सन्मानासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने पुण्यात शुक्रवारी (दि. २८) ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

महापुरुषांचा वारंवार होणारा अपमान, काही दिवसांपूर्वी हडपसरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकावर झालेली दगडफेक या घटना सामाजिक बंधुतेला काळिमा फासणाऱ्या व सकल हिंदूंचा अपमान करणाऱ्या आहेत. याचा निषेध करण्यासाठी आणि सामाजिक शांतता व सुरक्षा धोक्यात आणणारा गुन्हेगारांना दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देणारा' कायदा पारित करावा, या मागणीसाठी हे रास्ता रोको आंदोलन केले जाणार आहे. किवळे न्यू मुंबई-पुणे हायवे लोढा सोसायटीजवळ/नवले ब्रिज/गाडीतळ हडपसर येथे हे आंदोलन होणार असून आपल्या महापुरुषांचा सन्मान अबाधित राहण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने केले आहे.

# जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरूर या तालुक्यांतील २३३ अतिसवेदनशिल गावे 'संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' घोषित

**पुणे । प्रतिनिधी**

जुन्नर वनविभागातील मागील ५ वर्षातील बिबट वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य जखमी व मृत्यूच्या घडलेल्या घटना लक्षात घेता जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम (३०) (२) (iii) व (iv) अन्वये जुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड तालुक्यातील २३३ अतिसंवेदनशिल गावांना 'संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' म्हणून घोषित केले आहे.

जिल्ह्यातील उत्तरेकडील जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरुर या चार तालुक्यांचा जुन्नर वन विभागामध्ये समावेश असून या वन विभागाचे क्षेत्र व्यवस्थापनाच्यादृष्टीने अनुक्रमे जुन्नर, ओतूर, मंचर, बोडेगाव, खेड, चाकण व शिरुर या सात वनपरिक्षेत्रामध्ये विभागलेले आहे. जुन्नर वन विभागाचे बहुतांश क्षेत्र डोंगराळ असून यामध्ये पाटबंधारे विभागाचे सिंचन प्रकल्प आहेत. यात प्रामुख्याने घोड व कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे, माणिकडोह, पिपळगांव जोगे, बडन, चिल्हेवाडी, चासकमान असे मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्प असल्याने सिंचन सुविधेत वाढ झालेली आहे.

पाण्याच्या उपलब्धतेमुळे ऊस, केळी, द्राक्ष, डाळींब अशी दिर्घकालीन बागायती पिके या भागात मोठ्या प्रमाणात होतात. या दिर्घकालीन पिकांमध्ये बिबट्यांना लपण्यासाठी उत्तम निवारा आणि पाण्याची मुबलक उपलब्धता असते. तसेच शेती व्यवसायामुळे मानवाची पाळीव प्राण्यांसह शेतातील रहिवासांमध्ये वाढ झाली आहे. यामुळे पाळीव प्राणी भक्ष्य म्हणून सहज उपलब्ध होत असल्याने बिबट या वन्यप्राण्यांचा अधिवास अशा बागायती क्षेत्रातच निर्माण झालेला आहे. बिबट्यांचे वास्तव्य हे प्रामुख्याने ऊस शेतीत आहे.



या प्रकरणी गेल्या २३ वर्षापासून या वनविभागात मानव बिबट संघर्षामध्ये वाढ होत आहे. भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडुन या संस्थेमार्फत जुन्नर वनविभागाच्या हद्दीत करण्यात आलेल्या अभ्यासाअंती या क्षेत्रात बिबट वन्यप्राण्याच्या संख्येची घनता प्रति १०० चौ.कि.मी. मध्ये ६ ते ७ बिबटे इतकी आढळून आली आहे. तसेच बिबट्यांचे मानवावरील, पशुधनावरील हल्ले पाहता जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरुर या तालुक्यांमध्ये बिबट्यांची एकुण संख्या अंदाजे ४०० ते ४५० असण्याची शक्यता आहे. जुन्नर वनविभागात मागील ५ वर्षात बिबट वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात एकूण ४० गंभीर जखमी व १६ मृत्युच्या घटना घडलेल्या आहेत. या क्षेत्रात बिबट्याचा मानवावरील हल्ला होण्याच्या घटनेत वाढ झाली असून सदरचे क्षेत्र हे मानव-बिबट संघर्षाचे आपत्तीक्षेत्र झालेले आहे. बिबट वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमी व मृत्युच्या घटनेची व्याप्ती लक्षात घेता सदर क्षेत्र संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' घोषीत करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नामांकित महाविद्यालयासाठी मोठी स्पर्धा

**पुणे । प्रतिनिधी**

इयत्ता अकरावीच्या पहिल्या नियमित फेरीत शहरातील नामांकित महाविद्यालयाचा कट-ऑफ हा ९२ टक्क्यांपुढे गेल्याचे दिसून आले आहे. विशेषतः इंग्रजी माध्यमातून कला शाखेत प्रवेश मिळविण्यासाठी सर्वाधिक गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळाला आहे. त्याखालोखाल विज्ञान शाखेतील प्रवेशाचा कट-ऑफ आहे. शहरातील नामांकित महाविद्यालयातील विज्ञान शाखेपेक्षाही इंग्रजी माध्यमातून कला शाखेचा कट-ऑफ हा जास्त असल्याचे दिसून येते. त्यामुळे ९० पेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयात प्रवेशासाठी आणखी फेऱ्यांची वाट पाहावी लागण्याची शक्यता आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी पहिल्या नियमित फेरीची यादी गुरुवारी जाहीर करण्यात आली. यामध्ये ९१ टक्क्यांपेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येच मोठी स्पर्धा असल्याचे दिसून आले. मात्र, तरीही ८५ टक्के ते ९० टक्क्यांपर्यंत गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयात प्रवेशासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

यंदा फर्ग्युसन महाविद्यालयातील कला शाखेचा (इंग्रजी माध्यम) कट-ऑफ ९६.६ टक्के इतका आहे. तर या महाविद्यालयात विज्ञान शाखेचा कट-ऑफ ९५.६ टक्के आहे. तर लक्ष्मणराव आपटे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा कट-ऑफ ९५.८ टक्के असून हा विज्ञान शाखेतील शहरातील सर्वाधिक कट-ऑफ आहे. बीएमसीसी महाविद्यालयातील ९५.८ टक्के हा वाणिज्य शाखेतील सर्वाधिक कट-ऑफ आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा अकरावीच्या प्रवेशाचा कट-ऑफ वाढल्याचे दिसून येत आहे.